श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

# बाणगंगा

**अंक ९ वा**

**सन २०१७-२०१८**

संपादक

**डॉ. विजय जाधव**

प्राचार्य

कार्यकारी संपादक

**डॉ. भाऊसाहेब मुळे**

*** संपादक मंडळ ***

प्रा. डॉ. शेख राजमोहंमद

प्रा. त्रिवेणी गाडे

प्रा. साठे भास्कर

प्रा. पुंडे मनिषा

प्रा. सौ. काळे वर्षा

प्रा. मोहिते चेतना

प्रा.डॉ. सौ. कीर्तने वर्षा

प्रकाशक

**डॉ. विजय जाधव**

प्राचार्य

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

सदर अंकात प्रसिध्द करण्यात आलेले लेख, कविता यातील मते संबंधित लेखक, कवींची आहेत.
या मताशी संपादक मंडळ, महाविद्यालय व संस्था सहमत असेलच असे नाही.

# श्री बाणेश्वर शिक्षण संस्था

## विश्वस्त व कार्यकारी मंडळ

| अ.क्र. | सभासदाचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | **श्री. शिवाजीराव भानुदास कर्डिले** | अध्यक्ष |
| २ | **श्री. महादेव हरिभाऊ जाधव** | उपाध्यक्ष |
| ३ | **श्री. गोरखनाथ दौलत साठे** | सचिव |
| ४ | **श्री. सोमनाथ तुळशीराम गुंजाळ** | सहसचिव |
| ५ | **श्री. त्र्यंबक हरीभाऊ कर्डिले** | खजिनदार |
| ६ | **श्री. बाळासाहेब त्र्यंबक वाघ** | सदस्य |
| ७ | **मा. अक्षय शिवाजीराव कर्डिले** | सदस्य |
| ८ | **श्री. जनार्दन राधाकिसन कर्डिले** | सदस्य |
| ९ | **श्री. उत्तम चिमाजी जाधव** | सदस्य |
| १० | **श्री. भाऊसाहेब गंगाधर कर्डिले** | सदस्य |
| ११ | **श्री. प्रकाश कुंडलिक कर्डिले** | सदस्य |

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

## महाविद्यालय विकास समिती

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री. शिवाजीराव भानुदास कर्डिले | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. गोरखनाथ दौलत साठे | सदस्य (व्यवस्थापन) |
| ३) | प्राचार्य डॉ. विजय मच्छिंद्र जाधव | सचिव |
| ४) | श्रीमती चेतना प्रमोद माहिते | सदस्या (विभाग प्रमुख, प्राचार्य नियुक्त) |
| ५) | डॉ. भाऊसाहेब माणिकराव मुळे | सदस्य (अध्यापक प्रतिनिधी) |
| ६) | डॉ. राजमोहंमद हसन शेख | सदस्य (अध्यापक प्रतिनिधी) |
| ७) | प्रा. सौ. मनिषा नारायण पुंडे | सदस्या (अध्यापक प्रतिनिधी) |
| ८) | सौ. शैला गिरीष साठे | सदस्या (अध्यापकेतर प्रतिनिधी) |
| ९) | श्री. काशिनाथ मारुती हापसे | सदस्य (शिक्षण प्रतिनिधी) |
| १०) | सौ.डॉ. संध्या लक्ष्मण भंगाळे | सदस्या (संशोधन प्रतिनिधी) |
| ११) | श्री. ईश्वर बाजीराव गिरवले | सदस्य (समाजसेवक प्रतिनिधी) |
| १२) | मा. अक्षय शिवाजीराव कर्डिले | सदस्य (उद्योग प्रतिनिधी) |
| १३) | श्रीमती वर्षा अविनाश काळे | सदस्य (महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता समिती) |
| १४) | श्री. महेश बाबासाहेब कर्डिले | सदस्य (विद्यार्थी परिषद सचिव) |

# आदरांजली

या शैक्षणिक वर्षात जे जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ, कलावंत, साहित्यिक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत धुरंधर राजकारणी, संस्थेवर मनःपूर्वक प्रेम करणारे सहृदय, स्नेही, हितचिंतक, महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी त्यांचे आप्तेष्ट, विद्यार्थी दिवंगत झाले. अशा लाखो निष्पाप जीवांना संस्थेच्या व सर्व युनिटच्या वतीने





## भावपूर्ण...

# आदरांजली







# प्राचार्यांचे मनोगत....

विद्यार्थी बंधू-भगिनींनो,

बाणगंगा या वार्षिक नियतकालीकाचा सातवा अंक आपल्या हाती देतांना व त्याव्दारे आपणाशी संवाद साधताना मला विशेष आनंद होत आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत बुऱ्हाणनगरचे आराध्यदैवत आई तुळजाभवानीच्या आशिर्वादाने शैक्षणिक विचारांची शिदोरी बरोबर ठेवत बहुजन समाजाच्या उध्दाराचे स्वप्न उराशी बाळगुन मा. आ. शिवाजीराव कर्डिले यांनी १९८९ साली श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेची स्थापना केली. अल्पावधीतच ज्ञानाची गंगोत्री बुऱ्हाणनगरमध्ये प्रवाहित केली. प्राथमिक,माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची वन वन थांबवून शिक्षणाचे दरवाजे सर्वांसाठी खुले केली व अल्पावधीतच या संस्थेने मोठी प्रगती साधली याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री बाणेश्वर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय होय.

जुन २००४ मध्ये अवघ्या ५७ विद्यार्थी व ६ प्राध्यापकांवर सुरु झालेल्या या महाविद्यालयात सध्या ९७६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ३२ प्राध्यापक ज्ञानदानाचे कार्य करत आहेत.

बदलत्या प्रवाहाचा मागोवा घेत महाविद्यालयाने पारंपरिक उच्च शिक्षणाबरोबर व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु केले आहेत. नवनवीन अभ्यासक्रमाव्दारे उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता टिकवत असतानांच ग्रामीण भागातील आमचा विद्यार्थी खासगीकरणाच्या युगात २१ व्या शतकात आव्हाने पेलण्यास समर्थ बनला पाहिजे. ही भूमिका स्वीकारुन यासाठी आम्ही आवश्यक ती कौशल्ये, मुलाखत तंत्र, सामान्य ज्ञान, सॉफ्टस्कील डेव्लहपमेंट प्रोग्राम सारखे उपक्रम राबवित आहोत. ग्रामीण भागातील मुला-मुलींना उच्च शिक्षण पूर्ण करता यावे, त्यांच्यात श्रमसंस्कार रुजावेत, यासाठी 'कमवा व शिका' योजनेंतर्गत शिक्षण पूर्ण करण्याची संधी महाविद्यालयाने दिली. या बरोबरच विद्यार्थी कल्याण मंडळाच्या सर्व योजना व उपक्रमांमध्ये महाविद्यालय सहभागी होऊन नव भारताचे भावी आधारस्तंभ सक्षम करण्याचा महाविद्यालय प्रयत्न करीत आहोत.

या वर्षीचा 'बाणगंगा' हा आठवा अंक साकार करण्याचा आम्ही प्रयत्न केला. संस्थेच्या सहकार्याने प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे या अंकाची निर्मिती झाली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या साहित्यीक गुणांना वाव देण्यासाठीचे चांगले व्यासपीठ आहे व त्यात विद्यार्थी उत्स्फुर्तपणे सहभागी होतात,हे पाहून आनंद वाटतो.

अशा या बाणगंगा च्या सातव्या अंक निर्मितीसाठी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षणप्रेमी व्यक्तींनी सहकार्य केले त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

धन्यवाद !

**डॉ. विजय जाधव**
**प्राचार्य**

# संपादकीय...

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेची स्थापना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. शिवाजीराव कर्डिले व इतर संचालक मंडळ यांनी सन १९८९ साली केली. या माध्यमातून सर्वप्रथम माध्यमिक शाळा सुरु केली. नंतर उच्च माध्यमिकचे वर्ग सुरु केले. पंचक्रोशीतील इतरही ठिकाणी शिक्षणाची गरज पाहता त्याही ठिकाणी माध्यमिक शाळा सुरु केल्या.

उच्च शिक्षणाची मागणी आणि विशेषत: मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून या संख्येने सन २००४ साली श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयाच्या माध्यमातून अनेक गरीब मुलामुलींना, उपेक्षित घटकातील व खेड्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळू लागले. या शिक्षणातून सर्वच घटकातील विद्यार्थ्यांचे जीवन समृध्द होण्यास मदत होत आहे हे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीतून सिध्द होताना दिसते.

महाविद्यालयीन युवक हा उद्याच्या पिढीचा सुजाण नागरिक असतो. उच्च शिक्षणाने त्याच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावत असतात. समाजात घडणाऱ्या घटनांकडे तो स्वत:च्या नजरेने पाहत असतो आणि त्याचा अन्वयार्थ स्वत:च लावण्याचा प्रयत्न करीत असतो. या महाविद्यालयीन युवकांपुढे अनेक प्रकारचे माहितीचे मायाजाळ आहे. त्याच्या भोवती घडणाऱ्या सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक आणि वैयक्तिक घटनांचा त्याच्यावर अनुकूल प्रतिकूल परिणाम होत असतो. या घटनेच्या निरीक्षणातून त्याची वैचारिक बांधणी होत असते. हाच विचार शब्दबध्द करण्याचा अनेकदा तो प्रयत्न करीत असतो. मात्र त्याला व्यक्त होण्यासाठी विचारपीठ उपलब्ध होत नाही. त्याच्या या वैचारिक भावना व्यक्त करण्यासाठीच महाविद्यालयाचे हे नियतकालिक असते.

या नियतकालिकातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपापल्या भावभावना लेख, काव्य अथवा छोटाट्या चुटकुल्यातून व्यक्त केल्या आहेत. वैयक्तिक भावभावनांसोबत सामाजिक, राजकिय, शैक्षणिक विचारांवरही भाष्य व मंथन यात आले असून ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरणारा हा विद्यार्थी, वैज्ञानिक प्रगतीचा शोध बोधपर विचारही या नियत कालिकात मांडू लागला आहे. जीवनाच्या विविध अंगांचे दर्शन आपल्या लेखाच्या व कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी घडविले आहे.

महाविद्यालयाच्या हा आठवा वार्षिक अंक आहे. या अंकातील विविध लेखांचा आपण आस्वाद घ्यावा हीच सर्व संपादक मंडळाची इच्छा आहे. म्हणूनच हा अंक अधिकाधिक आकर्षक बनविला आहे. या अंकासाठी संपादक मंडळातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी घेतलेले कष्ट व परिश्रम स्तुत्य आहेत. त्याबद्दल सर्वांना धन्यवाद देतो.

**कार्यकारी संपादक**
**प्रा. डॉ. भाऊसाहेब माणिकराव मुळे,**
**मराठी विभाग प्रमुख**

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

## महाविद्यालय शिक्षक व शिक्षकेतर वर्ग २०१७-२०१८

समाजशास्त्र विभाग
डॉ. जाधव व्ही. एम. (प्राचार्य)

मराठी विभाग
प्रा. डॉ. मुळे बी. एम.
प्रा. डॉ. कीर्तने व्ही.एस.

वाणिज्य विभाग
प्रा. गाडे टी.डी.
प्रा. दरेकर ए.व्ही
प्रा. निंबाळकर वर्षा
प्रा. के.एस. जाधव

बी.सी.ए. विभाग
प्रा. वर्षा कर्डिले
प्रा. दारुणकर प्रेरणा
प्रा. पवार स्नेहल

लेखाधिकारी
श्री. विधाते ए.बी.

परीक्षा विभाग
सौ. शैला साठे

हिंदी विभाग
प्रा. डॉ. शेख आर.एच.
प्रा. राणी केदार

इतिहास विभाग
प्रा. सोनवणे एस.आर.
प्रा. राणी केदार

बी.सी.एस. विभाग
प्रा. काळे व्ही. ए.
प्रा. तृप्ती बोंदर्डे
प्रा. योगेश ढगे
प्रा. मीरा होणे

ग्रंथालय विभाग
प्रा. सचिन झोंड

शिपाई
श्री. कर्डिले एस.वाय.
श्री. नवनाथ साळवे
श्री. योगेश थोरवे
श्रीमती लोखंडे जे.एल.

प्रा. नागपुरे योगेश

इंग्रजी विभाग
प्रा. मेघा खोल्लम

भूगोल विभाग
प्रा. साठे बी.जी.

राज्यशास्त्र विभाग
प्रा. खांदवे एस.टी.

क्रीडा विभाग
प्रा. पुंडे एम.एन.

बी.एस्सी. विभाग
प्रा. मोहिते चेतना
प्रा. वाघ स्वाती
प्रा. लहारे निलिमा
प्रा. चैताली वैद्य
प्रा. बांगरे सर
प्रा. लोखंडे मॅडम
प्रा. धर्माधिकारी मॅडम
प्रा. कोमल सोनवणे
प्रा. नामदे पूजा

# बाणगंगा

**सन २०१७-२०१८**

## अनुक्रमणिका


| विभाग | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| मराठी | ११ |
| अहवाल | ५३ |

# मराठी विभाग

# स्त्री शक्तीला सलाम

भारतीय तत्वाज्ञानानुसार अस्तित्वाच्या त्रिकोणाच्या पायाच्या एका टोकाला पायाभूत सुविधा व समृध्दी देणारी लक्ष्मी. दुसऱ्या टोकाला शक्ती देणारी व संरक्षण देणारी महाकाली दुर्गा आणि त्रिकोणाच्या शिरोबिंदुमध्ये ज्ञान, कल्पना देणारी महासरस्वती असते. अशा प्रकारे या तीन शक्तींना महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती असे स्थान दिलेले आहे. पूजा जरी पुरुष दैवताची केली जात असली तरी चर्चा होते ती त्यांच्या शक्तींची, त्यांच्यात असलेल्या स्त्री शक्तीची.

स्त्री ही त्याग, नम्रता, श्रध्दा व सुजाणपणा याची मूर्ती आहे. ती कोणत्याच बाबतीत कमी नाही. पारंपारिकरित्या पुरुषांची समजली जाणारी क्षेत्रे महिला काबीज करत आहे. तसेच पोलीस, लष्करी दल या बरोबर, रिक्षा, ट्रक चालविणे. पेट्रोलपंपावर पेट्रोल भरण्याची काम करणे, बस कंडक्टर, पत्रकारिता, फायरब्रिगेड ही क्षेत्रे सुध्दा महिलांनी काबीज केली आहेत. सध्या भारतात मोठ्या पदांवर कार्यरत असलेल्या महिला आहेत. सध्या राष्ट्रीय राजकारणात महिलांची संख्या नगण्य आहे. आर्थिक क्षेत्रातही अनेक महिला मोठ्या पदांवर कार्यरत आहे. संशोधन क्षेत्रातही महिलांची संख्या वाढतेय ही चांगली गोष्ट आहे. स्त्रीची प्रतिष्ठा फक्त वीर पत्नी अथवा वीर माता होण्यात नाही तर वीर स्त्री होण्यास आहे. आधुनिक जगातील या व असंख्य हिरकणींनी आयुष्याचा पर्वत जिद्द आणि संघर्षमय लढा देवून चढला आहे. त्यांच्या या संघर्षामुळेच कित्येक आयुष्य उभी राहिली आहेत. त्यांच्या या संघर्षातून त्यांच्या उदयाच्या आयुष्याची पहाट उगवणार आहे. शेवटी जाता जाता एक दृष्टीक्षेप स्त्री कार्यावर –



✻ जगात सर्वाधिक भारतात नोकरी करणाऱ्या महिला.

✻ जगात सर्वाधिक महिला अभियंते भारतात.

✻ भारतात २५० उद्योगांमध्ये महिली कार्यकारी प्रमुख.

✻ भारतीय सैन्यात महिलांना परमंट कमिशन देण्याची न्यायालयाची शिफारस.

✻ उच्चशिक्षीत पदावर काम करणाऱ्या महिलांची सर्वाधिक संस्था भारतात.

✻ शिखा शर्मा, चंदा कोचर आणि इंदिरा नोथी यांचा जागतिक शंभर महिलांमध्ये समावेश.

शेवटी मी एवढेच सांगेल की मुलींनो, हे शतक तुमचे आहे. संधी गमावू नका. पुढे या आणि तुमची सकारात्मकता, मौलिकता जगा दाखवा. स्वतःला सिध्द करून जगाला पटवून द्या.

हमसे है जमाना सारा, हम जमाने से कम नही

***Girl the best*** जानलो बात ये मानलो !

**– प्रमिला महादेव कर्डिले**
**एफ.वाय. बी.एस्सी**

# सैनिक

भारताच्या सीमेवर सर्वांचे रक्षण करण्यासाठी तो सीमेवर तैनात असतो. तो सैनिक जन्माला आल्यापासूनच तर मोठे होईपर्यंत या काळात तो निर्णय घेत असतं की मला फौजी बनायचय. मला सीमेवर लढायला जायचय. मला आपल्या मातृभूमीचे रक्षण करायचे आहे. सैनिक जेव्हा सीमेवर लढायला जातो तेव्हा तो आपल्या मागे आपले जन्म देणारे, लहानचे मोठे करणारे आई–वडिल, बहिण–भावंडे आणि मित्र सगळ्यांना तो माग सोडून सीमेवर जात असतो. आपणही या देशाचे नागरिक आहोत. या मातृभूमीचे आपल्यावर ऋण आहे असे आपणही आपल्या मातृभूमीचे रक्षण करावे असं ठरवून तो आपल्या जीवाचा विचार न करता तो सीमेवर दुश्मनांशी दोन हात करत असतो. तो असतो आपला सैनिक. दिवस–रात्र, तहान–भुकेचे विचार न करा सीमेवर तटस्थ बनून खंबीरपणे सीमेवर राहून आपले कर्तव्य पार पाडतो तो असतो आपला सैनिक.

सैनिक हा शब्द आपल्या कितपत लक्षात राहतो, या शब्दाचा पूर्ण अर्थ सुध्दा आपल्याला माहिती नसतो. एखादा सैनिक दुश्मनाच्या हातून गोळीबारामध्ये शहीद झाला तर त्याच्या कुटुंबाच्या हातात जेव्हा त्या सैनिकाचा देह दिला जातो. त्या पूर्वी तो सीमेपासून तर सैनिकाच्या घरापर्यंत पोहोचण्यापर्यंत त्याच संरक्षण केले जातं. त्या सैनिकाचे सहकारी सगळे त्याला मानवंदना देण्यासाठी उभे असतात. परंतु आपण कधी सैनिकांच्या कुटूंबाच्या विचार केलाय का जेव्हा आपल्या मुलाचा देह समोर बघत असतील तेव्हा त्या आई–वडिलांच्या आपल्यावर दुःखाच आभाळ कोसळल्यासारखं वाटत असतं. तेव्हा आपल्या लाडक्या भावाचा देह नजरेसमोर दिसत असते तेव्हा त्या बहिण–भावाच्या मनाला काय वाटत असतं. त्या कुटुंबावर तेव्हा जी



वीज कोसळते त्याची अपेक्षाच करू नाही शकत त्यांची त्या क्षणाची परिस्थिती कशी असू शकते. पण ते याचा गैर फायदा ते मिडियावाले घेत असतात. दुःखात सामील व्हायच तर लांबच पण अजून त्यांना विचित्र विचित्र प्रश्न विचारून त्या स्थितीची काटेकोरपणे जाणीव करून देत असतात. तर आपण कोणाच्या दुःखात सामील होऊ शकत नसावा तर कधी कोणाच्या दुःखाच्या जखमेवर मीठ चोळायचे सोडून दयायला पाहिजे. तसे मिडियावाले त्यांच्या कुटुंबाच्या खर्च उचलणार, त्यांच्या लहान बहिण भावंडांचा शैक्षणिक खर्च करणार अशी वेगवेगळी आव्हानेही देत असतात. पण त्या सैनिकाची अशी इच्छा होती का ? की, आपण सैनिक झालो व कधी शहिद झालोय तर माझ्या कुटुंबाचा खर्च फुकट होईल ? नाही अशी इच्छाच काय विचार पण त्याच्या मनात नसतो. अशी जर इच्छा धरून कोणी भरतीला जात असेल तर तो कधी भरती नाही होऊ शकणार.

सैनिक बनण्यासाठी गेलेल्या तरुणांच्या मनात हाच विचार असतो की, आपण सैनिक झालो तर आपल्या कुटुंबाचे नाव मोठे होईल आणि मातृभूमीचे संरक्षण करायला मिळेल, देशाचीसेवा करण्याची या पेक्षा मोठी संधी कुठेच नसते. आपल्याला सैनिक बनून देशाची सेवा करता यावी अशी इच्छा त्याच्या सैनिकाच्या मनात असते. म्हणून यांच्यासाठी दोन

ओळी बोलाव्यासा वाटतात....
सैनिक वो होता है,
जो अपने देश की भक्ती करता है
जो सबकुछ छोडकर बॉर्डर पे लढत है ।

सैनिक वो होता है
जो शहिद होकर भी अमर होता है
जिस के लिए ये जवान अमर रहे
ऐसा नारा लगाते है

सैनिक वो होता है
जिसका नाम लेते ही, हमारा सर गर्व से
ऊँचा हो जाता है...
जिसकी देशभक्ती से और सेवा से
पहचाना जाता है

वो होता है सैनिक

म्हणून तर मी गर्वाने सांगु शकते. या देशात धन, दौलत, घर, संस्कार यामुळे आपण सुखी नाही आहोत तर तो सैनिक आपले रक्षण करतो. आपण सुखाने झोपु म्हणून तो रात्र-रात्र जागतो, आपण सुखाने पोटभर जेवू म्हणून तो दिवस-दिवस उपाशी राहतो. आपण आपले कुटुंब, नातेवाईकापर्यंत सर्वांना सोडून फक्त आपल्यासाठी अखेरच्या श्वासापर्यंत तिथे लढत राहतो. ते ही फक्त आपल्या देशासाठीच आपल्या माणसासाठी....!

'मी या देशात राहते याचा मला अभिमान आहे, आणि या देशात सैनिक आहेत याचा मला गर्व आहे.'

I love my India & I love Army

**- कु. पुजा पटारे**
**एस.वाय. बी.कॉम.**

# आयुष्य



**आयुष्य ही फार अवघड शाळा असते**
**आपण कोणत्या वर्गात आहोत**
**हेच आपल्याला माहित नसते**
**पुढची परीक्षा कोणती याची**
**कल्पना नसते**
**आणि कॉपीही करता येत नाही**
**कारण...**
**येथे प्रत्येकाची प्रश्नपत्रिका**
**वेगळीच असते.**


# लढा



नशिबाने साथ सोडली तर
हिम्मतीवर जगायचं असतं
आठवणीने रडायचं नसतं
परिस्थितीचा डोळ्याला डोळा
भिडवून सामोरे जायचं असतं...

**कु. कराळे रोहिणी (एस.वाय. बी.कॉम.)**

# २०१८ चा प्रजासत्ताक दिन



दरवर्षी २६ जानेवारीला साजरा केला जातो तो दिवस म्हणजे 'प्रजासत्ताक दिन.' भारत प्रजासत्ताक होऊन ६९ वर्षे पूर्ण झाले. पण यावर्षी अगदी आगळा वेगळा प्रजासत्ताक दिन साजरा झाला. यावेळी आपल्या भारताचे प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदी यांनी विविध एशियन देशांचे दहा प्रतिनिधी बोलविले होते आणि दरवर्षीप्रमाणे दिल्लीत मेन गेट वर प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. तिथे सुरुवातीला एशियन देशांच्या प्रतिनिधींचे स्वतःहा प्रधानमंत्र्यांनी त्यांचे स्वागत केले. आपले राष्ट्रपती मा. रामनाथ कोविंदजी यांचे ही स्वागत करण्यात आले.

ध्वजारोहन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला सर्व सेनाप्रमुख उपस्थित होते व चारही दलांच्या सेना तुकड्या उपस्थित होत्या. या कार्यक्रमात दरवर्षीप्रमाणे परेड करण्यात आली. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे यापैकी बीएसएफ च्या मुलींची परेड राबविण्यात आली. ही घटना भारतात पहिल्यांदाच घडली या वरूनच कळून आले की, 'लडकियाँ लडकोंसे कम नही' हे मात्र सिध्द झाले. यावेळी आपल्या भारताचे राष्ट्रपती मा. रामनाथ कोविंदजी यांच्या वतीने हुतात्मा सैनिकांना मानवंदना देण्यात आली. विशेष म्हणजे एक सलग चार दहशतवादयांना ठार करण्यात यश मिळविले व आपले जीवन वेशासाठी समर्पित केले. अशा 'ज्योती प्रकाश' या सैनिकाने आपल्या देशाची मान उंचावली. या सैनिकांच्या आई व पत्नीला सन्मानित करताना राष्ट्रपतींच्या डोळ्यात दुःखाश्रू आले. खरंच सिमेवर सैनिक किती तैनात असतात.

आपले सैनिक आहेत म्हणूनच आपण आहोत हे समजणे आवश्यक आहेत. या कार्यक्रमाला वेगवेगळ्या राज्यांच्या चित्ररंथांच संकलन करण्यात आले. या मध्ये केरळ,पंजाब, ओरिसा, बिहार, महाराष्ट्र हरियाणा, मध्यप्रदेश, आसाम अशा अनेक राज्यांच्या चित्ररथांच संकलन करण्यात आले होते. पण अभिमानाची गोष्ट ही आहे की, महाराष्ट्राच्या वतीने साकारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या चित्ररथांला संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक देण्यात आला.

खरंच २०१८ चा प्रजासत्ताक दिन काही आगळावेगळाच साजरा करण्यात आला.

**– सोनाली वामन (एस.वाय. बी.कॉम.)**

**जीवन जगायचं तर पावलांच्या**
**जोडीप्रमाणे जगावे,**
**प्रथम पुढे पडणाऱ्या पावलाला**
**गर्व नसतो, तर मागे पडणाऱ्या**
**पावलाला कुठलाच कमीपणा नसतो.**
**कारण दोघांनाही माहिती असतं**
**आपली स्थिती बदलत राहणारी आहे.**

**– प्रा. प्रेरणा अरविंद दारूणकर**
**बी.सी.ए., विभाग**

# पर्यावरण एक समस्या

भारतीय माणूस व्यक्तिगत स्वच्छतेचा जेवढा विचार करतो. त्याच्या शतांशाने देखील तो सार्वजनिक स्वच्छतेकडे लक्ष देत नाही. स्वतःच्या घरातील कचरा तो रस्त्यावर टाकतो. पानाच्या पिचकाऱ्या टाकतो वा निरूपयोगी कागदांचे कपटे कोठूनही फेकून देतो. आपल्याकडील भाजी विक्रीच्या मंड्या या कचऱ्याच्या ढिगांनी भरलेल्या दिसतात हे सारे हवेच्या प्रदुषणाला आमंत्रण ठरते. त्यामुळे निसर्गाचा समतोल आपण बिघडवत आहोत. याची आम्हांला जाणीवच नसते.

कारखान्यांमुळे वायु प्रदुषण होते. तसेच, कारखान्यातील दूषित मलीन पाण्यामुळे नद्या व समुद्र यांचे पाणी दूषित होते. समुद्रातील या दूषित पाण्यामुळे त्यातील मासे प्रचंड प्रमाणात मरतात नद्यांतील पाणी दूषित झाल्यामुळे पिण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही कामासाठी ते निरुपयोगी ठरत आहे. पाणी दुषित झाल्यावर ते स्वच्छ करण्याचा आटापिटा करण्याऐवजी ते दुषित न होण्याची काळजी आपण घ्यायला नको का ?

हवा, पाणी याबरोबर ध्वनि प्रदुषण ही आज एक मोठी ज्वलंत समस्या ठरली आहे. विशेषतः शहरांतील गर्दी, गोंगाट यामुळे ध्वनिप्रदुषण वाढत आहे. आपली उत्सव प्रियता फार अजब आहे. प्लास्टिकच्या पिशव्या व शहरात तयार होणारा घनकचरा ही एक वेगळीच डोकेदुखी झाली आहे.

पृथ्वीच्या भोवती असलेल्या वायुंच्या आवरणात ओझोन वायुचा एक थर आहे. पृथ्वीवरील जीवसृष्टीने संरक्षण होण्यासाठी हा वायू आवश्यक आहे.

पृथ्वीवरील वाढत्या प्रदुषणामुळे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढत आहे. हा वायु ओझोनवर अतिक्रमण करत आहे आणि या हल्ल्यात ओझोन नष्ट झाला तर सुर्याचे अल्ट्राव्हायोलेट किरण पृथ्वीवर येतील व येथील जीवसृष्टी पार नष्ट होईल अशी भीती वाटते.

या प्रदुषणावर उपाय म्हणून समाजाने म्हणजेच सरकारने काही ठाम निर्णय घेतले पाहिजेत आणि व्यक्तिगत पातळीवर आपण प्रत्येक नागरिकाने आपल्या काही सवयी बदलल्या पाहिजेत. झाडे तोडणे हा सरकारने मनुष्य वधाइतकाच गंभीर गुन्हा मानला पाहिजे. कारखान्यांतून व वस्त्यांतून वाहून येणाऱ्या सांडपाण्यावर सक्तीने प्रक्रिया करायला लावले पाहिजे. अशा तऱ्हेने प्राप्त झालेल्या पाणी बागेसाठी, शेतीसाठी वा गाड्या धुण्यासाठी वापरता येऊ शकते. प्लास्टिकच्या वापरावर कठोर बंधने आणली पाहिजेत. आपणही प्लास्टिक पिशवी ऐवजी कापडी पिशवी वापरण्याची सवय लावून घेतली पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी ध्वनिवर्धक वापरण्यास बंदीच घातली पाहिजे. आनंद व्यक्त करण्याच्या आपल्या पध्दतीतही आपण बदल केला पाहिजे. ध्वनिवर्धकावर गाणी वाजवणे वा फटाके वाजवणे या प्रकारांनीच आनंद व्यक्त होतो हे आपण विसरले पाहिजे. शाळा, महाविद्यालयांनी, जवळपासच्या उघड्या बोडक्या डोंगरावर, मोकळ्या जागी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचे उपक्रम राबवले पाहिजेत. हे सर्व कठिण वाटले तरी आपण केले पाहिजे. कारण आता आपल्या अस्तित्वाचाच प्रश्न उभा राहिला आहे.

**– प्रियंका मच्छिंद्र मोरे (एस.वाय. बी.एस्सी.)**



# काळ्या पैशातून कॅशलेस व्यवहारांकडे



रोखीच्या व्यवहारामुळे काळ्या पैशांची निर्मिती होते व तो निर्माण करण्यासाठीसर्वच जण हातभार लावतात. देश हितापेक्षा रोखीच्या व्यवहारांमुळेच त्यांना ही संधी मिळते. त्यामुळे शक्यतो बँकांमार्फत व्यवहार व्हावेत.

काळा पैसा म्हणजे कोणता पैसा असा साहजिकच प्रश्न निर्माण होतो. ज्या उत्पन्नावर कर भरावयास हवा होतो तो न भरलेला पैसा व लाचेच्या स्वरूपात दिलेली रक्कम याला आपण ढोबळ मनाने काळा पैसा म्हणतो. त्यामध्ये बिलाशिवाय व्यापार करणारे व्यापारी, व्यावसायिक, पर्यटनाचा व्यवसाय करणारे, राजकिय पक्ष, राजकिय नेते व नक्षलवादी आणि दहशतवादी पोसवले जातात. देशातील एकूण व्यवहारांपैकी बराचसा व्यवहार हा रोखीच्य स्वरूपात होत असतो. त्यातून आर्थिक शिस्त राहत नाही गरिबांचे जीवन असाह्य केले जाते.

रोखीच्या व्यवहारांवरती बंधन आणण्यासाठी सरकारने गुडस ॲण्ड सर्व्हिस टॅक्स (जीएसटी) चा वापर करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत चांगला आहे. त्यामुळे वस्तु/सेवा निमिर्तीच्या ठिकाणीच कर वसूल करावे लागणार आहे. त्यातून रोखीच्या व्यवहारांची कुठेही नोंद राहत नसल्याने ते हिशोबात येत नाहीत. त्यामुळे त्यावर कर भरला जात नाही. भ्रष्टाचार व्यवहार वाढतात व या वरती देखील कर भरण्याचा संबंध येत नाही. त्यामुळे हा काळा पैसा अर्थव्यवस्थेला मारक ठरतो. काही प्रमाणात तो चलनात येतो व काळ्या पैशांची समांतर अर्थव्यवस्था तयार होते. त्यामुळै बँकेचे नियंत्रण राहत नाही.

चलन रद्दची घोषणा होताच कोट्यावधी रूपये बँकेत जमा झाले साठविलेला पैसा जमा होऊ लागला. त्यामुळे बँका कर्जाचे जी कर्ज व्याजदर कमी करू लागले आहेत.

लोकांनी रोखीचे व्यवहार न करता बँकामार्फत करावे खेड्यातील जनता अशिक्षित असल्याने त्यांच्याकडून बँकामार्फतच व्यवहाराची अपेक्षा करणे चुक आहे, असे लोक म्हणतात. अशिक्षित म्हणूनच त्यांना संबोधले जातात. त्यांना मोबाईलचा वापर कुठे माहित होता पण खेड्यापाड्यातील मजूर, मोलकरणीच्या व शेतकऱ्याच्या हातात मोबाईल आपण पाहत आहे. त्यामुळे खेड्या-पाड्यातील लोक आता तांत्रिक पध्दतीने पुढे येत असताना आपणाला पाहण्यास मिळते. जनतेला सुधारण्याची इच्छा आहे. प्रत्येक गावात बँकिंगची सुविधा पुरविण्यास खेड्यातील शेतकरी, शेतमजूर, बँकामार्फत व्यवहार करतील.

नोटाबंदीमुळे भ्रष्टाचार, बनावट नोट, दहशतवाद, अंमली पदार्थांची आणि नक्षलवादावर नियंत्रण राहिल नोटाबंदीनंतर प्रत्येक पैशाचा हिशोब होऊन करचोरी थांबते. त्यामुळे देशात निर्मल अर्थव्यवस्था उभी राहिल. दैनंदिन व्यवहारांसाठी डेबिट/क्रेडिट कार्डांचा उपयोग करावा.

देशातला गैरव्यवहार संपावा यासाठी सरकारने नोटबंदीचे पाऊल उचलल असावे नोटाबंदीचा निर्णय घेतला नसता तर काही वर्षांतच भारतीय अर्थव्यवस्था पूर्णपणे ढासळली असती. सरकारने नोटबंदीच्या कठोर आणि महत्वपूर्ण निर्णयाने भारतीय अर्थव्यवस्थेवर भविष्यात चांगला परिणाम होईल. त्यातून देशाची अर्थव्यवस्था वेगाने प्रगती करील तरीही ही एक क्रांतीसाठी घडविणारी हा निर्णय आहे. परंतु नवीन नोटा येऊनही काही लोक २००० च्या खोट्या नोटा बनवून फसवेगिरी करत आहेत. त्यांनी असे न करता यामध्ये सहभागी होऊन काळा पैसा व भ्रष्टाचार कमी करण्यास मदत करावी.

कॅशलेस इंडिया, फ्रॉड लेस इंडिया

Cashless India, Froadless India

– कु. वृषाली मुळे (एस.वाय. बी.कॉम.)

# आईचे आभार...



✽ जेव्हा तुमचा जन्म झाला तेव्हा आईने तुम्हाला पाजले, आंघोळ घातली व तुम्हाला छोटेसे आंगड टोपलं घातले तेव्हा तुम्ही रडून रडून तिला रात्रभर जागवले.

✽ जेव्हा तुम्ही दोन वर्षांचे झाला तेव्हा आईने तुम्हाला चालावयास शिकवले. तेव्हा तिने हाक मारली तेव्हा तुम्ही दूर पळत गेला.

✽ जेव्हा तुम्ही तीन वर्षांचे झाले तेव्हा आईने सर्व काळजीपूर्वक ते जेवन  तयार केले. पण तुम्ही ते सर्व जेवण सांडवले.

✽ जेव्हा तुम्ही चार वर्षांचे होतात तेव्हा तुम्हाला आईने सांगितले की इथे जाऊ नको पण तुम्ही तेथे गेलात.

✽ जेव्हा तुम्ही पाच वर्षांचे झाला तेव्हा तुम्हाला जाण्यासाठी आईने सुंदर कपडे घातले तेव्हा तुम्ही ते घाण केले.

✽ जेव्हा तुम्ही सहा वर्षाचे होतात तेव्हा आईने तुम्हाला शाळेत बसवले तेव्हा तुम्ही रडून तिला खूप त्रास दिला.

✽ जेव्हा तुम्ही सात वर्षांचे होतात तेव्हा आईने तुम्हाला पाऊसात खेळलास  तेव्हा तुम्ही आजारी पडला तेव्हा आई रात्रभर चिंता करत बसली.

✽ जेव्हा तुम्ही आठ वर्षांचे होतात तेव्हा आईने सर्व काम आवरले तेव्हा तुम्ही सर्व वस्तु इकडे-तिकडे फेकल्या.

✽ जेव्हा तुम्ही नऊ/दहा वर्षांमध्ये तुम्ही आईने दिलेल्या शिकवणी कडे दुर्लक्ष केले.

✽ जेव्हा तुम्ही आईने तुम्हाला मारले तेव्हा तुम्ही तिला परत मारले.

✽ तेव्हा तुम्ही बारा वर्षांचे झालात तेव्हा आईने तुम्हाला तुमच्या भविष्याकाळाबद्दल सांगितले तेव्हा तुम्ही तिला सरळ उत्तर दिले की मला काही तुझ्यासारखे व्हायचे नाही मला.

✽ तेव्हा तुम्ही तरुण होतात तेव्हा आईने तूमच्या वाढदिवसानिमित्त सुंदर तयारी केली तेव्हा तुम्ही म्हणालात की मला खुप उशीर होणार आहे.

✽ जेव्हा आईने तुमचे लग्न केले. तेव्हा खूप वर्षांनी आई आजारी पडली तेव्हा डॉक्टरांनी सांगितले की, तुमच्या आईला रोग झाला तेव्हा तुम्ही तिला बाहेरचा रस्ता दाखविला.

✽ जेव्हा तुम्ही खूप मोठ्या संकटात होतात तेव्हा आईने तुम्हाला सोडवले आणि सरते शेवटी त्या रोगाने तुमच्या आईचा जीव घेतला आणि जन्मल्या पासून ते आता पर्यंत तुम्ही आईसाठी जे करायला हवे ते तुम्ही केले नाही तेव्हा आईला अशा परिस्थितीत पाहून  तुम्ही मोठ्याने हंबरडा फोडला ?

आ म्हणजे आत्मा आणि ई म्हणजे ईश्वर

**मोहिनी रामचंद्र सोनवणे (एफ.वाय. बी.कॉम.)**

# भावांमधील नाते



आई-वडिलांना वाटायचे भावाला भाऊ पाहिजे आणि बहिणीला बहिण पाहिजे म्हणून अनेक घरात बरेच भावंडे असायचे. तसे लहाणपणी भाऊ एकमेकांसाठी जीव टाकायचे. एकत्र खेळणे एकत्र कामे करणे, विनोद करणे. शाळेत जातांना एकत्र जाणे. घरामध्ये दादा दादा म्हणून मागे मागे फिरणे. एकमेकांची काळजी घेणे. एकाला लागले तर दुसऱ्याच्या डोळ्यात पाणी यायचे. एकमेकांचे कपडे घालणे. दादाही आपल्या लहान भावाची काळजी घ्यायचा. स्वतःला कमी घेवून आपल्या भावाच्या गरजा पुरवायचा. आई सांगायची काही झालं तरी एकमेकांची साथ सोडायची नाही. तेही आईला वचन दयायचे आम्ही कधीही साथ सोडणार नाही. कितीही मतभेद झाले तरी आई-वडिलांनाही धन्य वाटायचे. एकमेकांसाठी त्यागाची भावना असायची. असे मजेत चालले असताना भावाभावामध्ये काय झाले.

भावांचे लग्न झालेत व तेथूनच संबंधामध्ये दुरावा सुरु झाला. जमिनीच्या वाटणी मागू लागले एवढंच नाही एकाला थोडी जास्त जमीन गेली तर हमरीतुमरी वर यायला लागले. कोर्टकचेऱ्या सुरु झाल्या. एकमेकांचे तोंड बघणे म्हणजे अपशकून असे मानू लागले. घरांच्या विभागणीवरून वाद निर्माण आईवडिलांचा सांभाळ कुणी करायचा याबद्दल भांडणे सुरु झाले. त्यांचा सांभाळ करण्याची अधिक जमीन व पैसा याची मागणी करून लागलेत. बहिणींना दिवाळीला कोण साडी घेणार म्हणून बहिणींची वाटणी करायला लागलेत. आई एका भावाकडे व वडिला दुसऱ्याकडे असे चित्र दिसू लागले. काही वेळा मुले असून ही आई-वडिल मुलीकडे दिसतात. काही वेळा सर्व असूनही आई वृध्दाश्रमात दिसते. वाटणीसाठी एकमेकांचा खून सुध्दा करतात. आज जर नजर टाकली तर ९५% भाऊ भाऊ एकत्र फिरताना दिसत नाही व एकमेकांशी बोलतही नाही. एकमेकांच्या घरी जात नाही. काही तर एवढे कट्टर असतात एकाचा मृत्यु झाला तर अंतविधीलाही जात नाही. एखाद्या भावाला अपघात झाला किंवा आजारपणामुळे ॲडमिट व्हावे लागले तर त्याला भेटायला न जाता वरून भोगले अजून तो अशी भाषा वापरतात. एकमेकांच्या लग्नाकार्यालाही जात नाही.

एकाच आईच्या उदरात जन्म घेवून एवढी दुश्मनी कुठून आली कोण जाणे. आपण लहानपणी दिलेले शब्द सर्व विसरलेत. जो कुणी हा लेख वाचत असेल तर त्याने किंवा तिने विचार करावा ही आपण भावंडे खरंच बोलत नाहीत का तसे असेल तर सारे विसरून फोन लावा व माफी मागा किंवा भेटायला जा. क ाही वर्षांनंतर या पृथ्वीवर दोघं नसणार. परस्परांबद्दल आदर बाळगा. एक श्रीमंत असेल व दुसरा गरीब असेल तर ती दरी येवू न देता आपण भावंड आहोत याची जाणीव ठेवून एकमेकांबद्दल संबंध चांगले ठेवा. प्रेमाने दादा म्हणून हाक मारा. एकाने जरी केले तरी हे लिहिण्याचे सार्थक झाले असे मी म्हणेन.

माणुसकी हा एकच धर्म
गेल्यावर खांदा देवून काय उपयोग
जिवंत असताना हात दया एकमेकांना...

**– कल्याणी शेलार (एफ.वाय. बी.कॉम.)**

# पुरुष कोण आहे ?

पुरुष हा निसर्गात अशी एक गोष्ट आहे जो आपल्याय अगदी कमी वयापासून तडजोडी करायला चालू करतो. (१) तो आपल्या हिश्यातील मलाई कुल्फी सुध्दा आपल्या बहिणीला देतो. (२) तो आपल्या आईवडिलांनी सुखांसाठी आपल्या स्वप्नांचे बलिदान देतो. (३) तो आपली सर्व जमापुंजी अशा मुलींसाठी खर्च करतो जिच्या चेहऱ्यावरील हसु पहायला त्याला आवडते. (४) आपले पूर्ण तारूण्य आपल्या बायको आणि मुलांच्या सुखासाठी रात्री-बेरात्री काम करून कुठल्याही तक्रारी विना खर्च करतो. (५) तो त्यांच्या भविष्यासाठी कर्ज घेतो आणि ते फेडत बसतो. (६) तो खूर्प संघर्ष करतो आणि तरीही त्यांच्या आईचे, बायकोचे किंवा अधिकारी लोकांचे ओरडे खातो. (७) शेवटी त्याचे आयुष्य दुसऱ्यांसाठी झटण्यातच संपते. (८) आईचे ऐकले तर त्याला आईच्या पदराखालचे पोर बोलतात आणि (९) बायकोचे ऐकले तर त्याला बायकोचा गुलाम म्हणतात.

प्रत्येक पुरुषाचा आदर करा, कारण तुम्हाल माहित नसेल, त्याने आयुष्यात तुमच्यासाठी कुठले तरी बलिदान दिले असेल, पुरुष हा जेव्हा बाप असतो तेव्हा,

चांगल्या शाळेमध्ये आपल्या मुलाला टाकण्यासाठी धडपड करतो. डोनेशन भरण्यासाठी पैसे उधार आणतो. वेळ पडलीच तर तो हातापाया देखील पडतो. कारण तो बाप असतो.

मुलांबरोबर कॉलेजमध्ये जातो. त्यासाठी हॉस्टेल शोधतो. स्वतः फाटके बनियन तुम्हाला जीन्सची पॅन्ट घेऊन येतो.

स्वतः सतत बंद पडणारा मोबाईल वापरतो,



परंतु मुला-मुलीचा स्टायलीश मोबाईल देतोत. तुमच्या प्रिपेडचे पैसे तो स्वतःच भरतो. तरीही तो तुमच्या आवाजासाठी, तो ऐकण्यासाठी तरसतो. कारण तो बाप असतो.

जेव्हा आपली पोरगी सासरी जात असेल, तेव्हा तो मुलीला मात्र रडवताना थांबवतो, परंतु स्वतः लपून-लपून रडतो. तीला जाताना आनंदात पाठवतो. परंतु तो मात्र मनात का होईना दुःखी असतो. कारण तो बाप असतो.


जाताना तिच्या सासु-सासऱ्यांना हात जोडून सांगतो की माझ्या चिऊला नीट ठेवा. तिला समजावून घ्या.

कारण तो बाप असतो.

पुरुष असा असतो की तो कधी बाप, मुलगा, तर कधी नवरा असतो. त्याला प्रत्येकच वेळी आपल्यावर असणारी जबाबदारी पूर्ण करावीचे लागते.



# एक छानशी कथा... !



एक प्रवासी बोटीचा भर समुद्रात अपघात होतो. त्याच बोटेवर एक जोडप (पती–पत्नी) प्रवास करत असतात. ते दोघेही एकमेकांचे जीव की प्राण असतात. बोटीच्या अपघातामुळे ते एकमेकांना वाचवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करतात. त्यांची नजर आधारासाठी काहीतरी शोधण्यासाठी चुहकडे भिभिरत असते आणि अचानक त्यांना एक जीवन रक्षक बोट दिसते. एका म्हणीत म्हटलेलं आहे की, ''बुडत्याला काडीचा आधार'' अगदी तसेच होतं. ते दोघेही जीवाच्या आकांतात या जीवन रक्षक बोटी जवळ येतात. परंतु त्यांची घोर निराशा होते. त्यांना दिसते की, बोटीत फक्त एकच जागा शिल्लक आहे. पती पत्नीला बुडत्या बोटीवर मागे ठेऊन जीवनरक्षक बोटीत उडी मारतो. पत्नी बुडत्या बोटीवर थांबते. बोट पाण्याखाली जाण्याआधी ओरडून सांगण्याचा प्रयत्न करते.

शिक्षक गोष्ट सांगायचे थांबवतात,

वर्गात निरव शांतता –

वर्गातील प्रत्येक विद्यार्थी अगदी मन लावून तल्लीन होऊन गोष्ट ऐकण्यात गुंग झालेला असतो. अनपेक्षितपणे शिक्षकांनी गोष्ट सांगायची का थांबवली हा प्रश्न प्रत्येकाला पडलेला असतो आणि तेवढ्यात शिक्षक वर्गातील मुलांना विचारतात की, पत्नी पतीला काय म्हणाली असेल ? बहुतेक विद्यार्थी तर्क करून सांगतात की, पत्नी–पतीला म्हणाली असेल मला तुम्ही धोका दिलात. मी तुम्हाला ओळखलेच नाही. तुम्ही स्वार्थी आहात...! प्रत्येक विद्यार्थ्यांने आपआपली मते मांडली. तेवढ्यात शिक्षकांचे एका विद्यार्थ्याकडे लक्ष जाते. एक मुलगा मात्र गप्पच असतो. शिक्षक त्याला विचारतात, 'अरे तुला काय वाटते ते पण सांग' मुलगा म्हणतो, 'गुरुजी मला वाटत की, ती म्हणाली असेन, मुलांना सांभाळा.' शिक्षक चकित होऊन विचारतात, 'तुला ही गोष्ट माहित आहे ?' तो नकारार्थी मान हालवतो आणि म्हणतो , 'नाही गुरुजी मला गोष्ट माहित नाही, पण माझी आई वारली तेव्हा शेवटच्या श्वासाला ती हेच म्हणाली होती !' तुझे उत्तर बरोबर आहे. शिक्षक हलकेच म्हणाले, 'बोट बुडाली पतीने घरी जाऊन मुलीला एकट्यानेट लहानाचे मोठे केले.'

खूप वर्षानंतर वार्धक्याने त्या पतीला जेव्हा मरण आले. तेव्हा त्याच्या मुलीला एक डायरी सापडते. त्यातून असे समजते की, तीच्या आईला पतीला स्वतः जीवंत रहण्याव्यतिरिक्त दुसरा पर्यायच नसतो. त्या डायरीत पतीने पुढं लिहिलेलं असते, 'तुझ्या शेजारीच जलसमाधी घ्यायची माझी किती इच्छा होती. पण आपल्या मुलीसाठी मला तुला त्या सागराच्या तळाशी एकटीलाच कायम सोडून याव लागलं ! ही गोष्ट आपल्याला सांगण्या मागचा एकच उद्देश की चांगला किंवा वाईट कृतीच्या पाठीमागे कधी–कधी मोठी गुंतागुंत असते. ती आपल्याला सहज लक्षात येत नाही. त्यामुळे वरवर पाहून आपण कुणाहीबद्दल लगेच मन बनवून घेऊ नये. जे कोणत्याही कामात पुढाकार घेतात. ते मूर्ख असतात म्हणून नव्हे तर त्यांना त्यांची जबाबदारी कळते म्हणून जे भांडल्यावर आधी क्षमा मनतात. त्यांची चूक असते म्हणून नव्हे, तर त्यांना आपल्या माणसांची पर्वा असते म्हणून..! '

**राणी शिवाजी औसरकर (एफ.वाय. बी.एस्सी)**

# मुलगी

आज या जगाला मुलीला स्थान नाही. किंमत देत नाही. तिला आत्ताच परक्याचे धन समजतात. मुलगा म्हणजे आपल्याला पुढे तोच सांभाळणार. जीव लावणार असे समजून त्याला प्रेम देतात. त्याचे हट्ट पुरवतात. तो जे मागेल ते त्याला देतात पण मुलीला मन नाही का ? भावना नाही का ? हे आई-वडिल बघत नाही मुलीना प्रेमाने दोन शब्द बोलत नाही पण शेवटी मुलापेक्षा मलीच कामाला येतात हे मात्र त्यांना दिसत नाही.

दोघांमध्ये फरक करतात. मुलाने एखादा हट्ट केला किंवा मुलगा दोन दिवस त्या गोष्टींसाठी रुसलातरी त्या मुलाला ती गोष्ट मिळते. पण मुलगी प्रथम आपल्या बापाकडे बघते व गप्प बसते पण त्याच लक्ष्मीला तुम्ही लाथाळतात. तुम्हाला वाटते ती प्रॉपर्टीसाठी किंवा हक्कासाठी येथे राहते. पण हे चुकीचे तिला आई-बापाचे, भाऊ-बहिणीचे प्रेम हवे असते. त्यामुळे ती त्या गोष्टीसाठी तडपते.

मुलाला तुम्ही रोज कॉलेजवर जाताना १००-१५० रूपये देतात. पण १ दिवशी त्या मुलीला तुम्ही या दिलेल्या पैशाची किंमत काढतात असे का ? कारण तुम्हाला वाटते ती पळून गेली आपले नाव खराब होईल पण त्याच घरातील मुलाने असे केले तर जाणार नाही का? तिच्या वर असे बंधन का ? तिलाच का मित्र-मैत्रीण नसावे. तिच्यावर एका सगळे बंधन का ? तर मुलगा तुमचा म्हणून, भावाला वाटते की कधी या घरातून जाईल पणती या घरात असली की सारे घर भरलेले वाटते. तिला तुमचं काही हवं नसतं पण तिला प्रेम हवं असते.

आई-बाप आजारी पडले किंवा भांडण



झाले तरी देवाला एवढेच मागते की माझं घर नेहमी हसत राहू दे. जे होइल ते माझं कर. का तर तिला आई-बापाची किंमत असते.

आपल्या आई बापाचे पुढे काय होईल भाऊ नीट जीव लावेल का या विचाराने ती धसधसा रडते.जेव्हा तिच्या लग्नाची वेळ येते. तेव्हा आई-बापाला वाटते की आपली मुलगी जाणार आहे तिला आपले मानून जीव लावतात. जरा तिच्याकडे बघा. ती आपलीच आहे असे मानून तिला जीव लावा. लग्नात बिदाईच्या वेळेला तिच्या गळ्यात पडून ढसाढसा रडतात का ?तर ती आता परण्याचे धन झाली म्हणून. भाऊची पुढे नाही सांभाळले तरी ती त्यांना सांभाळते. मागचे सगळे दुःख विसरून आपल्या आई-बापावर प्रेम करू लागते. शेवटी मुलगीच कामी येते. तिला सुध्दा वाटत असते मला पणे हे हवे आहे पण ती आपल्या बापाकडे पाहून गप्प बसते. कारण तिला माहित असते आपल्या बापाला सगळेच बघावे लागते व ती आपल्या अपेक्षा विसरून परत प्रेम करते. आई-बापाला तिचा राग दिसतो व तिच्या मागचे प्रेम नाही दिसत. ती सगळं आपल्या घरासाठी करत असते. फक्त तिला हवे प्रेम आणि साथ यासाठी ती धडपडत असते. ती लग्न झाल्यावर

दुसऱ्याचे धन आहे असे नक्कीच म्हणतात, पण तिला तिकडे गेल्यावर आपली नाती, तिकडची नाती सांभाळावी लागतात असे म्हणतात. मुलगा त्याच्या पुढील आयुष्यासाठी काय घडून आणायचे असे सोबत घेऊन येतो. पण मुलगी दोन नात्यांमधील प्रेम, जिव्हाळा घेऊन येते. माणसं जेव्हा देव खुपचं खुश होतो ना तेव्हा त्या घरात मुलगी जन्म घेतात. पण ज्यांना मुलगी नाही त्यांना एकदा जाऊन विचारा त्यांच्या मनातले मुलीचे प्रेम.

वडिलांच्या पाठीशी कायम उभी राहते किंवा जी वडिलांना जपते, त्यांचे दुःख समजून घेते. कितीही लांब गेली तरी तिला आई–वडिल दुःखात आहे असते ती म्हणजे त्या घरातली मुलगी...

मुलीने मित्र–मैत्रीणी केल्या व त्यांच्या सोबत फिरायला गेली तर त्यांचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो हे चुकीचे. जर तुम्ही तिच्या सोबत मित्र म्हणून राहिलात तर ती संपूर्ण जग जिंकेल व त्यावर होणारे बलात्कार हे नक्कीच थांबवू शकतात असे वाटते. आपण या गोष्टीसाठी प्रयत्न कराल व मुलीचा पण मुलासारखे समजाल असे वाटते.

बापाच्या... खूप खूप लाडक्या असता या... मुली
थोडेच दिवस राहता पण... आयुष्य भराची
आठवण
देवून जातात या... मुली

खूप कविता गोष्टी आहे मुलींसाठी पण ही गोष्ट /लेख मनातला आहे म्हणून मला लिहावासा वाटला.

– श्वेता महेंद्र भंडारी
एफ.वाय. बी.कॉम.

# आयुष्य असंच जगायचं असतं...!



जे घडलं ते सहन करायच असतं
बदलत्या जागाबरोबर आपणही बदलायच असतं
आयुष्य अस जगायचं असतं
कुठून सुरु झालं हे माहित नसतं
तरी कुठे थांबायचं हे ठरवायचं असतं
आयुष्य असच जगायचं असतं...

कुणासाठी काहीतरी निःस्वार्थपणे करायचं असतं
स्वतःचा सुखापेक्षा इतरांना सुखवायच असतं
आयुष्य हे असच जगायच असतं...

दुःख व आश्रुंना लपवायच असतं
स्वत हसता हसत दुसऱ्यांना हसवायचं असतं
आयुष्य हे अस जगायचं असतं...

मरणानं समोर येऊन जीव जरी मागितला तरी
मागून मागून काय मागितलं अस म्हणायच असतं
आयुष्य असच जगायचं असतं...

इच्छा असो वा नसो जन्मभर वाकायचं असतं
पण जग सोडताना मात्र समाधानाने जायचं असतं
आयुष्य असच जगायचं असतं...

काटेरी ते रस्ता असतं
वादळी ते वार असतं
तरी आयुष्य हे असच जगायचं असतं....

– शेख जावेद अहमद
एफ.वाय. बी.कॉम.

# स्त्रीभ्रूण हत्या




भारतीय तत्वज्ञानानुसार तीन शक्तींना महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती असे स्थान दिलेले आहे. आजही आपण स्त्री शक्तीचे पूजा करतो. पण सत्यस्थितीत स्त्रीला तेवढा मान, सन्मान देतो का ? हा प्रश्न सर्वांसमोर उभा करणारा मोठा प्रसंग म्हणजे स्त्री–भ्रूण हत्या.

स्त्री भ्रूण हत्या हा प्रकार काही नवीन नाही. तो पुरातन काळापासून चालत आला आहे. परंतु त्यात वाढ तर २० व्या शतकात झाली. २० व्या शतकात विज्ञानाने मोठी भरारी घेतली आणि वैद्यकिय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. नवनवीन मशीनरीचा शोध लागला व त्याचा वापर व गैरवापर चालू झाला. सोनोग्राफी मशीनचा वापर स्त्री भ्रूण आहे ही नाही हे पाहण्यासाठी घेऊ लागला.

‘ती ’ जन्माला आली असती तर तिच नाव काय ठेवलं असत माहित नाही परंतु आली असती जन्माला ती तर नक्कीच नशीब तुझं पालटलं असतं. कुणी राणी तर कुणी तिला आयटम म्हटलं असतं.

स्त्री भ्रूण हत्येविरोधात कठोर कायदे होऊनही स्त्री भ्रूण हत्या बंद झाल्या नाहीत कारण यात फक्त आई–वडिल नाही तर सरकारी कर्मचारी, डॉक्टर यांचाही समावेश असतोच की, अन् मग त्या चिमुकल्या जीवाचा जन्म घेण्याचा, श्वास घेण्याचा प्रश्नच कुठे येतो.

स्त्री भ्रूण म्हणजे स्त्री जातीचे बाक अन् त्याची हत्या. स्त्री भ्रूण हत्या रोखण्यासाठी कायदयांबरोबर मनपरिवर्तनाची गरज आहे. जेव्हा स्त्रीकडे स्त्री जन्माकडे चांगल्या मनाने पाहण्याची दृष्टी समाजात येईल तेव्हाच स्त्री भ्रूण हत्या बंद होईल.

सरकारने स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी भारत प्रसूति पूर्व लिंग परिक्षण कायदा तयार केला. परंतु स्त्री भ्रूण हत्या थांबली नाही. आज स्त्री सर्व क्षेत्रात आघाडीवर आहे. परंतु तरीही आजही स्त्रीला तेवढा मान व सन्मान मिळतो का ?

स्त्री भ्रूण हत्या करण्याचे प्रमाण पुढे असचे सुरु राहिले तर वरदक्षणा जाऊन वधुदक्षिणा पद्धत लवकर सुरु होईल.

स्त्री भ्रूण हत्या हा एक गंभीर व कृष्ट प्रकार आहे. त्यास रोखण्यासाठी कायदयासमोर मनपरिवर्तनाची, समाज परिवर्तनाची गरज आहे. तर आज सर्वजण संकल्प करून स्त्री जन्माचे स्वागत करू या. ‘मुलगी वाचवा’ हा नारा आता घरोघरी होणे आवश्यक आहे.

**– अक्षय रामदास काकडे**
**एफ.वाय. बी.ए.**

# मुलगी वाचवा... लेक वाचवा...




आज मी स्त्री भ्रूण हत्या या विषयी माहिती लिहिली आहे. स्त्री भ्रूण हत्या म्हणजे काय या विषयी माहिती लिहित आहे की स्त्री म्हणजे काय तर स्त्री म्हणजे स्त्रीच्या पोटातून जन्मलेली मुलगी जी लहानाची मोठी झालेली व ती विवाह करून सासरी जाते आणि भ्रूणहत्या म्हणजे जिचा पोटात झालेला गर्भपात म्हणजे स्त्री भ्रूण हत्या !

आज आपल्या देशात खूप स्त्री, भ्रूणहत्या घडत आहे. मुलींना आपण जन्माला घालत नाही तिचा पोटाच गर्भपात केला जातो. पण जी स्त्री विवाह करून सासरी जाते ती सुध्दा एक मुलगीच आहे. आता तीच स्त्रीच म्हणते की, की मला मुलगी नको, मुलगा हवा. वंशाचा दिवा हवा. या घराला वारस हवा. पण मुलगी सुध्दा या घराची वारस बनू शकेल. आपण ही स्त्री भ्रूण हत्या टाळली तर मुलीला जन्माला घालू शकतो. जी मुलगी आपण पाहतो की आई–वडिलांना सांभाळते त्यांची सेवा करते ती खरी मुलगी. पण आपण मुलाला जन्माला घालतो रक्ताचे पाणी करून पाजतो तोच मुलगा आपल्या आई–वडिलांना बाहेर हाकलतो. मग सांगा मुलगा श्रेष्ठ की मुलगी श्रेष्ठ ! मुलीचा गर्भपात करणे ती मुलगी आपल्या आई वडिलांचे नाव कमावते. स्वतःच्या पायावर उभी राहून शिक्षण घेते. मग का त्या मुलीचा गर्भपात होतो ? आज बघा या देशात सुनिता विल्यम्स, सरोजिनी नायडू, सावित्रीबाई फुले,राजमाता जिजाबाई या सुध्दा स्त्रीच होत्या. सावित्रीबाई फुले यांनी तर मुलींसाठी शाळा सुरु केली. मुली तर या मुलांपेक्षा वरचढ ठरत आहे.

आज बघा मुलगी लहानाची मोठी होऊन सासरी जाते. सासरी गेल्यावर सासु–सासरा, पती, मुले व आई–वडिलांची काळजी घेते. आपले घर सांभाळून ती आपल्या स्वतःची काळजी घेते. पण आपण काय करतो ? मुली असली की हुंडा लागतो, तिच्या लग्नासाठी म्हणून तिचा गर्भपात होतो. पण मी आज सांगते की, बेटी बचाओ... बेटी पढाओ...

पण बघा आज आपण मुलीला जास्त मानत नाही तर मुलाला जास्त मानतो तर काय तो वंशाचा दिवा आहे. पण तोच आपल्या आई–वडिलांना बाहेर पाठवतो. म्हणून मी म्हणते, 'मुलीला जन्माला घाला, तीला वाढवा, ती आपले संगोपन करेन.'

पण आपण ज्या मुलीचा पोटातच गर्भपात करतो ती सुध्दा एक स्त्रीच आहे.आपण जर या मुलीचा गर्भपात केला तर या मुलांना बायका कोण देणार ? आज बघा या काही–काही ठिकाणी तर मुलांना बायका सुध्दा नाही मिळत. म्हणून मी म्हणते या मुलींना जन्माला घाला तिला वाढवा, तिला शिक्षण द्या ती आपले नाव कमवेल.

मी एक तुम्हाला दोन–तीन ओळी म्हणून दाखवते –

ये बाई<br>
सांग ना बाबांना<br>
मला पण राणी बांधायची आहे<br>
दादास ! जीवन भेटतेय आहे.<br>
तर मला पण पाहायचे आहे सुंदर जग<br>
अशी जीवनातून उठवू नका ना

स्त्री भ्रूण हत्या थांबवा
स्त्री पुरुष समानता
मुलगा–मुलगी एक समान,
दोघेही उंचावील देशाची मान
मुलगा–मुलगी भेद नको,
मुलगी झाली खेद नको

आज मला मुलींबद्दल मला जेवढं सांगाव तेवढ कमीच कारण मी सुध्दा एक मुलगीच आहे. आजच्या या जगाच्या दृष्टीने बघा किरण बेदी, सायना नेहवाल, पी.टी.उषा यांनी इतकी मेहनत घेतली व त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या. जिद्दीने शिकल्या व आई वडिलांचे मान कमावल. बघा मुली कशा आहेत आणि मुले इकडे तिकडे गप्पा मारतात. कुणाची तरी छेड काढतात म्हणून म्हणते मुलींना जन्माला घाला.

राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांची उद्दिष्टये पूण करणे ही मार्च अखेरच्या सर्वांत महत्वाचा कार्यक्रम. उद्दिष्ट्ये पूर्ती करताना सर्वात मोठी अडचणी सांगितली जाते. ती प्रत्येक कुटुंबामध्ये किमान एक तरी मुलगा असावा. मुलगा म्हणजे कुटुंबातील वंशाचा दिवा, मुलगा म्हणजे कुटुंबातील संपत्तीचा वारसदार अशा प्रकारच्या गैर समजुती पाहावयास मिळतात. एवढेच नव्हेतर तीच कुटुंब, कुटुंबनियोजन पध्दतीचा अवलंब करण्यास मात्र नकार देतात. त्याच बरोबर मुलगाच हवा या हव्यासाकरिता अनेक अपत्यांना जन्मास घालतात किंवा अनेक मुलींची जन्माआधीच हत्या होते. आपण म्हणतो की, 'मुलींचे शिक्षण, प्रगतीचे लक्षण' मुली जर शिक्षण करत असल्या तर त्यांना बळ द्या त्यांना अडवू नका.

**– जयश्री गजानन भगत, एफ. वाय. बी.ए.**



# छत्रपती शिवराय

**छत्रपती शिवरायांचा**
**प्रताप ऐसा महान**
**सुवर्णक्षरांनी लिहिले**
**इतिहासाचे पान ।।**

**जिजाऊ सारखी आई लाभली**
**आईच त्यांची गुरु**
**बाळकडूतून शौर्य लाभले**
**संग्राम जाहला सुरु**
**स्वराज्य स्थापना करण्यासाठी**
**हाती घेतले निशाण ।।**

**मावळे मिळवूनी सारे**
**बनविले सारे शिलेदार**
**बलिदान करण्यासाठी**
**राहती सदैव तयार**
**मातृभूमीसाठी कितीकांनी दिले आपलु प्राण ।।**



**मित्र असो वा शत्रू**
**दिला प्रसंगी मान**
**मातेसमान परनारीला**
**हृदयी दिधले स्थान**
**नव युवकांनो असे असावे**
**जीवन आपुले छान ।।**

**– स्वाती शिवाजी वाघ (एस.वाय. बी.ए.)**



# खरंच आजची स्त्री अबला की सबला ?

स्त्री अबला की सबला या एकच मध्यबिंदू असलेल्या रेषेच्या दोन बाजू एकीकडे आकाशाला गवसणी घालायला गेलेली आणि गतप्राण झालेली कल्पना चावला ही एक स्त्रीच होती ना... महाराष्ट्राची राजकन्या प्रतिभाताई पाटील, अवकाश कन्या सुनिता विल्यम्स, पी.टी.उषा, किरण बेदी आणि कर्तृत्वाच्या जोरावर यशाचे शिखर गाठू शकल्या. मग तुम्हीच सांगा या नवयुगातील आदिशक्ती नवदुर्गा यांची रूपे असलेली स्त्री अबला की सबला ...?

ढाळू नको अश्रू पुसणार कोणी नाही,
ही हाक यातनांची ऐकणार कोणी नाही,
जीवन जगण्याचे मार्ग जरी खुल्ले गं,
या तुझ्यात देवतांनी तुलाच लुटले गं.

खरंतर स्त्री ही अबला कधी नव्हतीच. तिला जुनाट पुरुषी अहंकाराने, विचाराने अबला बनवले होते.

स्त्री जीवनाच्या प्रत्येक वळणावर पुरूषाने स्त्रीला जपावं, तिला आधार द्यावा. तिच्या चारित्र्याला जपावं, तिच्या बरोबरीने चालावे, तिला साथ द्यावी, ही परिस्थिती असावी म्हणजे स्त्री सबला.

आजच्या समाजाच्या मते स्त्री म्हणजे फक्त अश्रु. पण हा अर्थ नव्हे स्त्रीचा तर स्त्री म्हणजे एक गृहलक्ष्मी आहे. स्त्री म्हणजे पुरुषाच्या तालावर नाचणारी कळसूत्री बाहुली नव्हे. संसार रथाची दोन चाके म्हणजे स्त्री आणि पुरुष. पुरुषाच्या रागाच्या आगेला विझवण्याची प्रचंड ताकद स्त्रीमध्ये आहे. एवढे सर्व गुण असताना स्त्रीला अबला हे नाव देऊच शकत नाही. ती सबलाच आहे. पण आज ही स्त्रीच या विधात्याला मागणं मागतेय की नको हा स्त्रीचा जन्म. हे सारं का घडतंय ? त्याच कारण म्हणजे स्त्रीला सहन करावा लागणारा अन्याय, तिला मिळणारी अमानुष वागणूक, तिच्यावर होणारे अत्याचार ही दुष्टता पुरुषाच्या कोणत्या तत्व प्रणालीत बसते ?

स्त्री म्हणजे क्षणाची पत्नी, अनंत काळाची माता हीच का तिची रूपं. ज्या समाजाने या स्त्रीला अबला हे नाव दिले त्या समाजाला हे विसरता कामा नये की या स्त्रीचं खरं नाव आहे महिला–महिला म्हणजे महिषासुरमर्दिनी ताकद, हिमालयाचा उत्तुंगपणा असलेली निसर्गरम्य मांडणी म्हणजे महिला. महिला म्हणजे महानशक्ती. कोणताही पुरुष स्त्रीला आता बंदिनी बनविण्यात कधीच यशस्वी होऊ शकत नाही. तिने रुढी, परंपरा झुगारून, गुलामगिरीच्या बेड्या तोडून स्वतंत्रजीवन जगण्यास सुरुवात केली आहे.

स्त्री जन्मा तुझी कहाणी
हृदयी अमृत नयनी पाणी

स्त्रीने आकाशात उंच भरारी घेतल्यावर स्वतंत्र जीवन जगण्यास सुरुवात केल्यावर मनाला खात्री पटायला सुरुवात होते की नाही स्त्री सबला आहे. तोवरच कानावर कोपर्डी प्रकरण, रेणुका

चौधरी, अमृता देशपांडे यांच्या बातम्या येतात. तेव्हा वाटते की नाही स्त्री अबलाच आहे. ती अजूनही त्या चाकोरीबध्द रहाट गाडग्यात अडकून अबला बनून राहिली आहे.

मला वाटतं आजच्या स्त्रीमध्ये सबलतेची कमतरता झाली आहे. नाहीतर तुमच्या इच्छेविरुध्द तुम्हाला पटवून घेतल नसतं. एकतर्फी प्रेमाला प्रतिसाद देत नाही म्हणून अंगावर ॲसिड नसत ओतलं. पहा स्त्री मुक्ती उपभोगायला गेलं की जीवनमुक्तीच मिळते ही !

हम मचलते है, तो तुफान आ जाएगा
हम उबलते है, तो भुजाल आ जाएगा
हमे बदलने की कोशिक मत कर ए भय
हम बदलते है, तो सारा इतिहास बदल जाएगा

आज स्त्रियांनी राजकारण, बँका, समाजकारण माहिती तंत्रज्ञान, वैद्यक क्षेत्र, माहिती व्यवस्थापन अशा प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आजची स्त्री आता नेतृत्व करायला मागे पडत नाही. अहो ! पारतंत्र्याच्या काळात अरुणा असफ अली, झाशीची राणी ते इंदिरा गांधी पर्यंत स्त्रिया उगमगल्या नाही. त्या या संगणक युगात काय उगमगणार !

पण ज्यावेळी हा समाज हे स्त्रीला अबला नाव देता आणि त्याचेवळी पी.व्ही. सिंधु, साक्षी मलिक, प्रतिभाताई पाटील, साावित्रीबाई फुले या सारख्या महिलांची नावे, उदाहरणे समोर येतात. तेंव्हा मनात शंकाच येत नाही आणि विचार पक्का होतो स्त्री ही सबलाच आहे. ती अबला नव्हतीच.

कुणा कृष्णासाठी अमृत म्हणून विषाचा घोट मीरेप्रमाणे नाही घ्यायचा कारण परित्याग आता निरर्थक ठरतोय. कुणा एकवचनी रामासाठी काट्याकुंट्यांचा वनवास सीतेप्रमाणे नाही भोगायचा कारण विश्वास आता पायदळी तुडवला जातोय. कुणा धृतराष्ट्रासाठी डोळ्यावर पट्टी बांधून गांधारीप्रमाणे नाही जगायचं कारण स्वबळावर आता लढा दिला जातोय. कुणालातरी सबल करण्यासाठी अबला म्हणून नाही जगायच कारण स्त्री आता सबला आहे.

चांद अधुरा है, सितारों के बिना,
गुलशन अधुरा है, बहारों के बिना,
समुंदर अधुरा है, किनारों के बिना,
जीना अधुरा है, नारी के बिना।

खरंच आजची स्त्री सबला आहे ती सबला होती आणि ती सबलाच राहणार.

**अश्विनी रघुनाथ शिंदे**
**एस.वाय. बी.एस्सी.**

# Love and Life

*God made woman to make man live,*
*God made man to make woman live,*
*God made both to make both live,*
*Both man and woman to love and live,*
*Had one been out there'd be no other,*
*Life would be dark -- not bright*
*Both holves in love become one whole --*
*One in mind, in body, too --*
*Just One Sow !*

***- Teldhune Elizabeth Yoseph***
***S.Y. B.Sc.***

# मुलीचे मन...



मन पाखरू पाखरू
त्याची काय सांगू मात
आत व्हतं भुईवर
गेलं गेलं आभाळात

मुलींच मन हे पाखरासारखं आहे. त्यांच्या मनात त्यांची असंख्य स्वप्ने असतात. अगदी उंच उंच स्वप्ने, तिथे पोहोचण्यासाठी अपारकष्ट, जिद्द आणि अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. आज प्रत्येक क्षेत्रात जेवढ्या स्त्रिया उच्च पदस्थ आहेत किंवा त्यांच्या पराक्रमांनी युक्त आहेत. त्यांनी त्यांची स्वप्ने साकारलेली आहेत. धन्यवाद देते त्या माता-पित्यांना की त्यांनी त्यांच्या स्वप्नांना पंख दिले. अंतराळवीर कल्पना चावला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, झाशीची राणी लक्ष्मीबाई आणि मुलींच्या शिक्षणासाठी ज्यांनी लोकांचे शिव्या शेणाचे गोळे झेलले अशा सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे संगीत, राजकारण, वादन, नृत्य, वर्क्तृत्व या क्षेत्रांतील स्त्रिया असे अनेक उदाहरणे की ज्यांच्या पंखांने स्वप्नांचे अनेक विध रंग भरले गेले. आजी त्यांच्या कीर्तीचा सुगंध दरवळतो आहे. त्या असामान्य होऊन गेल्या.

कधी-कधी असं वाटतं
स्वतंत्र व्हावं
स्वप्नांच्या पलिकडे जावं
कधीच नाही का होणार असं
जसं मनात येत तसं

स्वप्न म्हणजे आपण झोपल्यावर बघतो तो नव्हे तर स्वप्न म्हणजे जे पूर्ण करण्यासाठी झोप येत नाही. प्रत्येक परी तिच्या कल्पकतेप्रमाणे स्वप्न पाहते. पण ध्येय मात्र एकच असते. असं काहीतरी बनावं की समाजाने आपल्याला नजरेनं बघावं. प्रत्येक मुलीला स्वप्नं पूर्ण करण्यासाठी गरज आहे ती आई बाबांच्या साथीची,

हिम्मत घ्या थोडी
दया रक्त
नको नुसती नाती
साथ राहु द्या फक्त

मुलींना त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रत्येक पावलांवर संकटांना सामोरे जावे लागते. अशा निराशेच्या रित्या समुद्रात जशी दुःखाची नाव आहे इथे असतं फक्त भावनांचं वादळ इथे मुलींच्या स्वप्नांना काही किंमतच नाही. इथे सांगण्यापुरती साथ असते. प्रत्यक्षात मात्र काही वेगळेच असते मुलींचं जीवन म्हणजे चार भिंतीच्या आतच पिंजऱ्यात ठेवलेल्या पक्षाला जशी आकाशात उंच परंतु जी इच्छा पूर्ण करणं हे सर्वांनाच जमते असे नाही. कधी आई-वडिलांना वाटते मुलगी मोठी झाली आता लग्न केले पाहिजे. मुलगी कितीही शिकली मोठी झाली तरी तिला चुल अन् मुलं एवढंच करावं लागतं. पण ते असा विचार नाही करत की आपली मुलगी शिकली मोठी झाली तर आपले व लग्न करून ज्या घरात जाईल त्या घराचे नाव उंचावेल अन् विचार बदलेल.

मोठं व्हायचंय मला
मला स्वप्न पूर्ण करायचंय

मला उंच-उंच जायचंय
संपूर्ण राष्ट्रात नाव करायचंय

आई-वडिलांना खूप वाटते आपली मुलगी शिकावी परंतु आजुबाजुला घडणाऱ्या घटन ऐकून त्यांना वाटते आपल्यावरती वेळ येऊ नये म्हणून ते मुलीला थोडं शिकवून लग्न करतात आणि सुखाने राहा असा आशीर्वाद देतात.

सुखाची स्वप्ने डोळ्यांत लपवावी
डोळे उघडताच ती पूर्ण झालेली असावी

उदात्त आणि उत्तुंग असणाऱ्या सुंदर स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी हे २१ व्या शतकातील प्रत्येक वडिलधाऱ्या व्यक्तींनो तुमच्या चिमुकलीच्या स्वप्नांना पंख द्या.

गुण सुखाचे कदी कुणाला
आजवरी उलगडले
मी शोधते एक गाव स्वप्नांच्या पलिकडले !

**- कु. वृषाली मुळे, एस.वाय. बी.कॉम.**

# मैत्री

**काही मैत्रीची नाती काळानंतर घट्ट होतात, तर**
**काही मैत्रीची नाती काळानंतर कमकुवत होतात**
**काही आयुष्यभर साथ सोडतात तर**
**काळी अर्धवट साथ देतात**
**काही निःस्वार्थपणे साथ सोडतात**
**चांगला मित्र पावसासारखा नसतो**
**जो कोसळतो आणि जातो तर**
**चांगला मित्र हवे सारखा असतो**
**जो दिसत नसला तरी**
**नेहमी साद घालत असतो.**

- कु. कराळे रोहिणी (एस.वाय. बी.कॉम.)

# साद घालते तुला माणसा...

राजकारणाचा डावा तुमचा
माझ्यावरी का ठेपला
निरपराध पाखरू मी
नेम माझ्यावरीच का धरिला
बागडण्याचे वय माझे ते
हिरावून का घेतले ?
माझ्यावरती अत्याचार करताना
तुझ्या मनाला का ना रूतले
स्त्री म्हणून जन्मले
यात काय केला मी गुन्हा
याच स्त्री-जातीसाठी
रडशील तू पुन्हा-पुन्हा
समानतेचे गोडवे तुच
माणसा का गातो ?
अत्याचाराच्या काटेरी वाटेला
तूच का नेतो ?
समजावून घे तू
स्त्री-जातीला आता तरी
अमानवी हे कृत्य तुझे
टोचू दे तुझ्या अंतरी
शिवबा माझा सांगुनी गेला
अत्याचाराला कलम केला
जिजाऊंचा आशीर्वाद त्याला
स्त्री-रक्षणासाठी त्याने जन्म वाहिला
तुझ्याचमुळे रक्षण आमुचे ऐरणीवर आले
आरक्षण नको रे मला
संरक्षणच खूप झाले
दारूचे विष हे तु नराधम प्याला
अमानुष अत्याचारापायी
कोपर्डीचा बळी गेला

कु. कराळे रोहिणी (एस.वाय. बी.कॉम.)

# स्त्री पुरुष समानता - काळाजी गरज



स्त्री व पुरुष ही संसार रथाची दोन चाके आहेत असे मोठ्या कौतुकाने म्हटले जाते. पण रथ नीट चालायला हवा तर ही चाके सारखी हवीत, त्यात कोणताही लहान मोठेपणा असता कामा नये. संसारात स्त्री व पुरुष यांना समान हक्क. समान मान असतो का ? फार पूर्वीपासून आपल्याकडे स्त्री घर सांभाळा असे आणि संपत्ती मिळवण्याचे काम पुरुष करत असे. संसारगाडा चालवण्यासाठीच केलेली ही कामाची विभागणी होती. पण यातूनच नकळत विभागणी हाती. पण यातूनच नकळत कमावणारा पुरुष प्रधान आणि शिजवणारी स्त्रीही गौण मानली जाऊ लागली. 'चुल-मूल' सांभाळणाऱ्या स्त्रीला काय अक्कल असते. तिला काय कळतयं. हा विचारच मुळी स्त्रीला गुलाम बनवण्याच्या मनोभूमिकेतून पुढे आला. मग स्त्री झाली लाथा खाणारी पायाची दासी !

आज हे चित्र बदलले आहे. स्त्रीने आपली कार्यक्षमता सिध्द केली आहे. शहरातील स्त्री कचेरीतील बौध्दीक काम लीलया करते. अगदी प्रमुख अधिकारपदही सांभाळते. विद्यालयांत, महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करते. तिने वैद्यकिय क्षेत्राबरोबर स्थापत्य क्षेत्रातही नावलौकिक मिळवला आहे. आजच्या युगातील माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रातील ती अग्रेसर आहे. ती गाडी, आगगाडी, विमान चालवते. अंतराळात झेप घेते आणि समुद्राच्या तळाशीही संशोधनासाठी जाते. कोणतेही क्षेत्र तिला असाध्य नाही. खेड्यातही स्त्रिया आज पुरुषांच्या बरोबरीने शेतात राबतात, कष्टाची काने करतात, गुरे सांभाळणे, कुक्कुटपालन अशी कामे करतात. सरपंच, उपसरपंच अशी पदे सांभाळतात आणि गावाचे प्रश्न जिद्दीने सोडवतात. मग आता स्त्री व पुरुष यांत भेदभाव करणे योग्य आहे का ?

दुर्दैवाची गोष्ट अशी की, अजुनही असा पक्षापात केला जातो. काही कामांच्या ठिकाणी पुरुषाची मजुरी स्त्रीच्या मजुरीपेक्षा नेहमी अधिक असते. असा फरक का ? स्त्रीपण तेवढेच कष्ट करते. मग तिच्या कष्टाचे मोल कमी का ? उलट आजची स्त्री घरातील पत्नी, माता व सून या भूमिकेतील गृहिणीची जबाबदारी पार पाडून शिवाय बाहेरची कामेही करते. मुलांचा अभ्यास, बँकाशी संबंधित व्यवहार, आजार पण या जबाबदाऱ्याही ती पार पाडते. तरी पणकाही घरांतून स्त्रियांच्या मताला किंमत दिली जात नाही.

काही खेड्यात, तालुक्याच्या ठिकाणी स्त्री सरपंच किंवा जिल्हा परिषदेची अध्यक्ष झाली, तर काही मंडळी अजूनही तिला त्रास देतात, पण आजची सक्षम स्त्री त्यांना पुरुण उरत आहे. आज ग्रामीण स्त्रिया आपले बचतगट स्थापन करून स्वावलंबी होत आहेत. तेव्हा आता स्त्रीला कमी लेखणे योग्य नाही. आई-वडिल हे दोघेही मुलाच्या दृष्टीने महत्वाचे आहेत, हे ओळखून आता विचारपूर्वक पावले टाकली जात आहेत. आता मुलाच्या सर्टिफिकेटस, पदवी प्रमाणपत्रे यांत वडिलांच्या नावाबरोबर आईचेही नाव छापले जाते. पुष्कर वसाहतीत घरकुल हे घरातील स्त्रीच्या नावावर केले जाते. काळाप्रमाणे बदलणे आवश्यक आहे. हे आता आपल्या समाजाने जाणले आहे.

**- तुषार थोरात**
**एस.वाय. बी.ए.**

# महिला अत्याचार



सामाजिक विषमता ही जात, धर्म आणि लिंग या तीन घटकांवर आधारित आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान मिळत आले आहे. स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तु आहे. अशी पारंपारिक, प्रतिगामी मानसिकता आहे. स्त्रियांना शिक्षण, सत्ता, संपत्तीचे सारे अधिकार नाकारण्यात आले होते. धार्मिक कायद्यांचा आधार घेऊन स्त्रियांवर अधिकाधिक बंधने लादली गेली. सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह या सारख्या अनेक अन्यायकारक चालिरितीनी लाखो महिलांचे अवघे आयुष्यच करपून टाकले. भारतात ब्रिटिशांचे आगमन होईपर्यंत या निर्दयी प्रथा चालूच होत्या. ब्रिटिश काळात जोतीबा फुले आणि सावित्रीबाई, राजा राममोहन रॉय यासारख्या भारतीय समाज सुधारकांची स्त्री स्वातंत्र्याची चळवळ आणि ब्रिटिशांचा स्त्री विषयक पाश्चात्य दृष्टीकोन यामुळे ब्रिटिशांनी अनेक वाईट चालिरिती बंद करण्यासाठी कठोर कायदे केले.

गेल्या अनेक वर्षात स्त्रियांवर होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. प्रत्यक्षात सरकारी आणि सामाजिक संस्थांनी स्त्री अत्याचाराची आकडेवारी उपलब्ध करून दिली आहे. स्त्रियांवरील अन्याय/अत्याचार दूर करण्यासाठी प्रभावी कायदे आणि त्याची कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहेच. परंतु त्याच बरोबर आवश्यक आहे ती जनजागृती स्त्रिया मुलींना मार्गदर्शन करणे अत्यंत महत्वाचे आहे. आज काल प्रेम प्रकरणांमध्ये झालेली वाढ लक्षात घेता मुलगा आणि मुलगी या दोघांचेही समुपदेशन करण्याची गरज आहे. प्रेम करणे ही वाईट गोष्ट नाही. परंतु प्रेमाच्या नावाखाली अश्लीलतेचा जो नंगानाच चालू असतो. तो फार भयंकर आहे. आजच्या काळातील तरुण–तरुणी यात फारच आघाडीवर आहेत. अनेक तरुणांची जी प्रेम प्रकरणे चालू आहेत ते आपल्या जोडी दाराबरोबर निर्जन स्थळी जावून अश्लील चाळे करतात. हे निश्चितच सामाजिक हिताचे लक्षण नाही प्रेम ही उदात्त भावना बाजुलाच राहते आणि वासनेचा बाजार सुरु होतो. अशा घटनांमध्ये बहुतांशी वेळा मुलीच बळी पडतात. महिलांना आजच्या युगात दिले जाणारे स्थान हे खालच्या पातळीवर आहे. परंतु आता सरकारने केलेले कायदे हे फार महत्वाची भूमिका पार पाडत आहेत. महिलांना दिले जाणारे स्थान आता हल्लीच्या काळात बदलत जात आहे. परंतु हा बदल होत असताना असे जाणवते की, खरंच हा बदल होत आहे का ? कारण आपण प्रत्येकजण म्हणतो की, स्त्रियांना त्यांचे सर्व अधिकार दिले गेले पाहिजेत. त्यांचे हक्क प्रदान केले पाहिजेत. पण खरे पाहिले असता पुरुषप्रधान संस्कृतीत मात्र महिलांना दुय्यम स्थान आजही दिले जात असलेले दिसून येते. आजही अनेक ठिकाणी मुलगी जन्मास आली की तिला घरातूनच वागणूक व्यवस्थित मिळत नसल्याचे दिसते. हीच स्त्री आज पुरुषाच्या खांद्यास खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिध्द करीत असतानाही तिला आजही पुरुषी अंगपणाचा सामना करावा लागतोय.

आजकालच्या लोकांच्या मानसिक विचारात बदल होण्याची गरज आहे.

मी या पुरुष प्रधान समाजात वावरणारी आजची स्त्री हुंडाबळी, विनयभंग, अत्याचार, छेड–छाड, बलात्कार, स्त्री–भ्रूणहत्या, अशा अनेक समस्यांशी झुंजणारी, सहनशिलतेचा अंत होईपर्यंत सहन करणारी आणि शेवटी स्वतःला संपवणारी. पण याला जबाबदार कोण ? या कोल्ह्या–लांडण्यांच्या, गावगुंड पातळीवर उतरलेला समाज की स्वतः स्त्री ? हे प्रश्न मनाला वेड लावतात. म्हणूनच स्त्रीयांचे प्रश्न मांडण्याचा हा एक प्रयास. आज जे वर्तमानपत्रातून, टी.व्ही. तून वा आजुबाजुला जे घडतंय हे सर्व किती मनाला वेड लावणार आहे. मी कोणी लेखिका नाही एक सामान्य विदयार्थिनी पण आज वाटलं उतरवावं हे सर्व आज तिरस्काराच्या कागदावर माझ्यासारखेच प्रश्न तुम्हालाही पडत असतीलचना ?

स्त्री एक माता, एक मुलगी, एक बहिण, सून, बायको, मैत्रीण, काकी, मावशी, वहिनी अशा कित्येक भूमिका सहज रित्या पार पाडते. ती शिक्षित असली तरी वा अशिक्षित असलीतरी संसारातले असो वा व्यवहारातले प्रश्न किती चुटकीनिशी सोडवते. घरात रुचकर जेवन बनवणारी अन्नपूर्णा मुलांना संस्काराचे बालकडू पाजणारी संस्कारलक्ष्मी, शिक्षणाचे धडे देणारी सरस्वती, चालायला बोलायला शिकवणारी माता, पतीने दिलेल्या सुखसोयींवरन जगता त्याच्या खांद्यालाखांदा लावून घर, नोकरी सांभाळून घराला हातभार लावणारी अर्धांगिनी घरातील आजारी व्यक्तींची काळजी घेणारी. घरावरील प्रत्येक संकटांना सामर्थ्याने पेलणारी रसिका. ह्या प्रत्येक भूमिका ती प्रामाणिकपणाने निःस्वार्थ मनाने पार पाडत आलीये. भारतातील कित्येक स्त्रियांनी विविध क्षेत्रात लक्षणीय कामगिरी बजावल्यात. गाण कोकिळा लता मंगेशकर, फॉरेन मिनिस्टर वी.एस.रमादेवी, आय.पी.एस.ऑफिसर किरण बेदी, गव्हर्नर सरोजिनी नायडू, इंडियन एअरलाईन पायलेट दुर्गा बॅनर्जी, पंतप्रधान इंदिरा गांधी या सर्व असो वा अंतराळात पोहचलेली कल्पना चावला या सर्वांनी दाखवून दिलयं कोणत्याही क्षेत्रात स्त्रीया मागे नाहीत. तरीही स्त्रीला पाहिजे असलेला मान, सम्मान, प्रतिष्ठा तिला मिळत नाही आणि तिच्या वाट्याला येतो तो फक्त अपमान... आज महिलांनी आपली वेगळी ओळख पटवून दिलेली असून सद्धा या कोल्ह्या–लांडग्यांच्या समाजात स्त्रियांना हिनवले जाते. ते का ? छेडछाड, अत्याचार, विनयभंग, बलात्कार अशा अनेक समस्यांना तिल तोंड द्यावे लागते. स्त्रियांची पात्रता असून देखील त्यांनी चूल आणि मूलचं सांभाळावे हीच अपेक्षा केली जाते. पण असे खालच्या पातळीचे विचार करणारे हे किती सहज रित्या विसरतात. आपल्या जुन्या लोकांची ही एक म्हण आहे, जिच्या हाती पाळण्याची दोरी.... तीच जगास उद्धारी...

मुलगा घराचा कुलदीपक आणि मुलगी हे ओझं समजले, जाते असे का ? मुलगा घराचा कुलदीपक तर मुलगी घराची पंती असे का समजले जात नाही. वंशाला दिवा हवा पण मुलगी नको म्हणून जन्माच्या आधीच तिचा गळा घोटला जातो, असं का ? वयात येण्या आधीच घरच्यांचा ओझं कमी करण्याच्या अट्टहासापाई बाहुलीशी खेळणाऱ्या वयात तिच्या आयुष्याचा खेळ मांडला जातो, असं का ? हुंडाबळीच्या रूपाने स्त्रीला जिवंतपणी मरणयातना भोगाव्या लागतात, असं का ? बलात्कार या शब्दानेही घाबरणाऱ्या मुलींना फुलण्या आधीच कुस्करून टाकले जाते, असं का ? शारीरिक सुखासाठी पिसाटलेल्या कुत्रांकडून देहाचे लचके

तोडले जातात असं का ? हे आणि असे असंख्य प्रश्न मनाला वेड लावून जातात. खिन्न करून सोडतात. पण याला कारणीभूत कोण ? समाज की स्वतः स्त्री ?

यत्र नार्येस्तु पुज्यन्ते
रमन्ते तत्र देवता

हे संस्कृत मधील एक वचन आहे याचा अर्थ असा की जिथे स्त्रियांना पुजले जाते त्यांचा आदर केला जातो तेथे देवाची निवास असते. पण आज आपल्या समाजात स्त्रियांना प्रत्यक्षात असे वागवले जात नाही. मंदिरात ज्या दुर्गेला, कालिकेला, पार्वतीला तुम्ही पुजता तिच स्वरूप समजल्या जाणाऱ्या स्त्रीयांची मात्र कित्येक घरात विटंबना होते. आपल्या संस्कृतीत प्रत्येक स्त्री वा परस्त्री माते समान मानून तिला वंदिले पुजले जाते. पण प्रत्यक्षात तिला भोग्य वस्तू समजून अपमानित करतात. पण हे करणारे कोण ? एक स्त्रीच्याच पोटी जन्म घेतलेले हे नराधम. जे पुरुष प्रधान समाजाचा झेंडा मिरवतात ते हे लांच्छनास्पद कृत्य करतात आणि जिच्यामुळे या जगात आले तिलाच कलंकित करतात. आजची स्त्री कितीही शिक्षीत असली. स्वतःच्या पायावर उभी असली तरीही ती सुरक्षित नाही हे खरंच आपलं दुर्दैव हे सर्वकाही माझ्यासारख्याच विचारी मनांना अस्वस्थ करणार आहे.

महिला म्हणजे म–मन, हि–हित, ला–लावण्य जपणारी अशी जगात तिची प्रतिमा तयार झाली आहे. पण तिच्यावर अत्याचार झाला तर ती पेटून उठते आणि महिला म्हणजे म–मरण देणारी. हि–हिसकावून घेणारी, ला–लाथळणारी अशा रूपा परावर्तित होते. स्त्रीच्या मनाचा थांगपत्ता देवालाही लागत नाही असे म्हणतात. अत्याचाराची परिसिमा गाठली की ती कुणाचीही राहत नाही.




भल्याभल्यांना ती महिला धूळ चारते. स्त्री ने मनाने ठरवले तर सावित्री होवून यमाकडूनही पतीचे प्राण परत आणू शकते. दिल्लीच्या निर्भय प्रकरणाने आणि आपल्या नगरच्या कोपर्डी प्रकरणाने तर महिलांवरील अत्याचार किती हीन पातळीचे असू शकतात हे दाखवून दिले आणि पुरुष किती क्रुरपणे महिलांवर अत्याचार करतात हे दाखवून दिले. महिला सक्षमीकरणाच्या केवळ गप्पा मारून काही होणार नाही तर त्यासाठी कठोर उपाययोजना करणे खूप गरजेचे आहे. शिवाजी महाराजांनी जशी रांझाच्या पाटलाल स्त्रीवर अत्याचार केला म्हणून त्याचे दोन्ही पाय आणि हात तोडून शिक्षा केली होती. तीश शिक्षा अशा अत्याचारी लोकांना सरकारने देणे आता आवश्यक आहे. मगच महिलांवरील अत्याचाराला खराखुरा पायाबंद असेल असे मला वाटते. माझ्या सर्व सखींना माझी हीच विनंती आहे. आपल्याला रचायचाय एक नवा इतिहास, आपल्यासाठी आणि उदया जन्माला येणाऱ्या आपल्या प्रत्येक चिमुरडी साठी उठा. अभिमान बाळगा स्त्री असल्याचा आणि दाखवून दया. या जगाला आणि समाजाला. बांगड्याचे वजन पेलणारे आमचे हे मनगट वेळ पडल्यास समशेरही पेलू शकते.

**– शुभांगी राजेंद्र रणदिवे**
**एफ.वाय. बी.कॉम.**

# साद.... एक 'नकुशी' ची

जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाची उद्धारी असं म्हणताना खूप छान वाटते. स्त्रीचा आदर वाटतो. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा असतो असं बदलून आता मुलगी वंशाची पणती असं ते चित्र कुठे-कुठे पाहायला मिळते. परिस्थिती बदलतीयं ह्याचा खूप आनंद वाटतो पण अजूनही काही ठिकाणी याचं स्त्रीच्या वाट्याला अनेक अवहेलना येतात. हे ही तितकंच कटू सत्य आहे. एकीकडे स्त्रीबद्दल खूप बोललं जात पण ते कृतीत तितकस बदलेल अजूनही दिसत नाही पण तरीही बदल होत चालला आहे याच समाधान.

असं वाटत असतानाच एक टी.व्ही. वरील मालिका पाहिली. मालिकेचं नाव होतं 'नकुशी' आणि थोडसं वेगळचं वाटलं. मालिकेचा एक एपिसोड शांत बसून पाहिला. आणि वाटलं खरंच एका पाठोपाठ एक मुलगी जन्माला आल्या की त्याचं नाव 'नकुशी' ठेवणे कितपत योग्य आहे ? आम्हीही तिघी बहिणी आहोत पण काही ठिकाणी अशी परिस्थिती आहे. कधीही 'नकोशी' हे नाव एखादीला नसेल पण वागणूक तशी असू शकेल.

आपल्या जन्माचं एवढं मोठ कारण किंवा सत्य किंवा मग आपल्या नावाचं एवढा मोठा असा अर्थ असतानाही ती सगळ्यांना हसवते. सगळ्यांशी प्रेमाने वागते. सगळ्यांना आपलसं करते. मग ती खरचं नकोशी आहे का ? असा प्रश्न आपणा सर्वांनाच पडायला पाहिजे.

तिलाही प्रश्न पडत असतीलच की, मी ही इतरांसारखीच आहे. सगळ्यांसारखीच सर्वांशी प्रेमाने वागते. तरीही माझ नाव नकुशी का? जिच्या



मनातलं ते दुःख तिची साद आपण ऐकालाच हवी ती फक्त कानापर्यंत नव्हे तर ह्दयापर्यंत पोहोचली पाहिजे. यासारख्या अनेक फक्त नावानेच नकोशी असल्या नाही तर असं वागणाऱ्या अनेक मुलींची ती हाक

केव्हा समजणार या समाजाला
आज विचार करण्याची वेळ
ही आर्त हाक ऐकायला येती का कुणाला ?
हा स्वर एकीचा नाही तर
हा आहे अनेक मनामिकांचा

**कु. अश्विनी वामन (एस.वाय. बी.कॉम.)**

## आयुष्य

आयुष्याच्या चित्रपटाला once more करता येत नाही. हत्या-हत्याशा वाटणाऱ्या क्षणांना download करता येत नाही. नको-नकोश्या वाटणाऱ्या क्षणांना delete करता येत नाही. कारण हा रोजचा तोच-तो असणारा Reality show नाही. म्हणून भरभरून पुर्णपणे जगा, कारण Life हा चित्रपट पुन्हा लागणार नाही.

# इंटरनेट ऑफ थिंग्स

फेसबुक, ट्विटर आदि सोशल मिडियामुळे यात प्रतिदिन प्रचंड भर पडत आहे. परिणामी इंटरनेट ऑफ थिंग्स या संकल्पनेने माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. सध्याच्या डिजीटल युगात मानवी सुसह्य करायचे काम संगणक व इतर उपकरणे करत आहेत. संगणक आणि इंटरनेट यांचा संयोग असलेल्या स्मार्टफोन मार्फत वापरकर्त्याला असंख्य सुविधा मिळतात. या सोयीसुविधा मिळवून देण्यामागे विविध ॲप्सचा फार मोठा वाटा आहे. हा स्मार्टनेस औद्योगिक क्षेत्रापासून वैद्यक, शास्त्र, वाहने आणि थेट घरगुती पातळी पर्यंत दिसू लागला. त्यामुळे दोन किंवा जास्त स्मार्ट मशीन्स एकमेकांशी बोलून माणसाचा हवे ते काम परस्परच करून टाकतात. त्यामुळे प्रत्येक यंत्राला समजावून सांगावे लागत नाही. या प्रत्येकाला 'इंटरनेट ऑफ थिंग्स' असे म्हणतात.

'डेटा' या शब्दाची जागा 'बिगडेटा' ने घेतली. संगणकीय डाटा च्या महासागरात डेटा माइनिंग, बिझनेस इंटेलिजन्स किंवा नॅलिटिक्स अशा संगणक प्रणाली डेटाचे रुपांतर माहितीत व माहितीचे रूपांतर ज्ञानात करून ज्ञानाधिष्ठत सोसायटी निर्माण करण्याचे प्रयत्न सुरु असून ते मोठ्या प्रमाणात यशस्वी होत आहेत. मशीन लर्निंग, आर्टिफिशियल, इंटेलिजन्स, डिप लर्निंग, अशा तंत्रज्ञानाची जोड मिळून अधिकाधिक ज्ञानाची प्रभावीपणे निर्मिती होत आहे. या सर्व बदलांसाठी हार्डवेअर किंवा इलेक्ट्रॉनिक्स उद्योगधंद्याचे व व्यावसिकांनी केलेल्या संशोधनाचे मोठे श्रेय आहे. अत्याधुनिक संगणक प्रणालींसाठी आवश्यक असणाऱ्या नवनवीन, परिणामकारक व स्वस्त अशा




हार्डवेअर व नेटवर्किंग उपकरणांची निर्मिती या उद्योगांनी केल्यानेच संगणक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडू शकतात.

**– प्रा. वाय.सी. ढगे**
**विषय – इलेक्ट्रॉनिक्स**



Aajadi Ka Josh Kabhi
Kam na hone deige...
Jab bhi zaroorat padegi desh ke
liye jaan luta deinge
Kyoki Bharat hamara desh hai
ab dobara is par koi aanch
na aane denge...

Teldhune Elizabeth Yoseph
S.Y. B.Sc.



# बेटी है तो कल है

स्वागत करा मुलींचे
निर्व्याज प्रेमाचे
ममतेच्या अथांग सागराचे
निर्मळ हृदयाचे राखीच्या पावित्र्याचे
विश्वाच्या माऊलीचे पिकरणाऱ्या भूमीचे
उमलणाऱ्या बहरणाऱ्या कळीचे
भावाच्या बहिणीचे
तान्हुल्याच्या आईचे
जात्यावर गुणगुवणाऱ्या आजीचे

ही नाती तेव्हाच आस्तीत्वात येतील जेव्हा एका मुलीचा जन्म होईल. तिला गर्भातच मारुन टाकले तर वरील नाते फुलणाऱ्या बहरण्याच्या आतच कोमेजून जातील आणि सावित्रिच्या लेकीची संख्या कमी होत जाणार देशाला मिळणाऱ्याज्या कर्तृत्ववाण व्यक्ती लाभल्या त्या मिळू शकणार नाही. मुलगी आणि मुलगा याची संख्या यातं असमतोल निर्माण होऊन जाणार आणि असा असमतोल पुढे हानिकारक असू शकतो. मुलगी जन्माला आलीच नाही तर पत्नी, आई, आजी, मामी, काकू हातावर राखी बांधणारी ताई, घरातील लक्ष्मी, भातुकलीचा खेळ खेळणारी लहानशी चिमुकली याच अस्तित्व अंधारात येईल. त्या मुलीचा जन्मतः काही दोष नसताना तिला मारले जाते आणि जन्माला आली तर तीला या असुरक्षित जगाचा सामना करावा लागतो. म्हणजे आईच्या पोटातून जी कळी जन्माला येते. तीच बहरण्याचे वय असतं आणि काही राक्षस वृत्तीचे लोक तिला बहरण्याच्या फुलण्याच्या आतच ती मुरझून जाते.

मुलगी रस्त्यावरून चालली तरी तिला असुरक्षितता वाटते. याची सर्व कारणे तिचा जन्मदर घटता आणि मुलांचा वाढता जन्मदर.

देवी म्हणता तुम्ही मजला
मानता तुम्हीच मलाच ममता
मग का करता ही क्रूरता
मज हिरावून का पापी बनता
देवी म्हणता तुम्ही मजला
गाऊनी आरती खुश करता
मी एकटीच दिसता
तुम्ही राक्षस बनता

मुलींचे होणारी हेळसांड आजच्या जगात आपण रोज पाहतो. दररोज एक उमलणारी कळी मुरझून जाताना पाहतो.

कोण पाहिजे
जन्म दयायला आईच पाहिजे
राखी बांधायला बहिणच पाहिजे
गोष्टी सांगायला आजी पाहिजे
हट्ट पुरवायला मावशी पाहिजे
पुरणपोळी भरवायला मामी पाहिजे
जीवनाच्या सोबतीला मैत्रीण पाहिजे
आयुष्याच्या साथीला बायको पाहिजे.
पण हे सर्व करायला आधी
एक मुलगी जगली पाहिजे.

**– अंबिका पोपट वामन (एस.वाय. बी.ए.)**

# मेरे सपनों का भारत



मैं भारतवासी हूँ। भारत महान देश है। इसकी सभ्यता और संस्कृति अत्यंत प्राचीन है। यहाँ विभिन्‍ जातियाँ, विभिन्न संस्कृतियाँ और विभिन्‍ भाषाएँ, प्राचीन काल से नदी के अजस्त्र प्रवाह की तरह अभी भी विराजमान है। यह सभी इंद्रधनुष के समान अपने विविध रंगो से अपने सौंदर्य को बिखरते हुए ऐक्य रुप है। यही भारत की महान परंपरा है।

हमारा देश भारत सोने की चिडिया कहलाता था। विदेशी इसकी समृध्दी और वैभव से जलभून जाते और इसपर आक्रमण कर इसकी संपत्ती को लूटकर ले जाते थे। उन्होने हमारे देश को पराधीन बनाया और हमारा खुब शोषण किया। किंतु इन विदेशी आक्रमणकारियों के आक्रमणों को रोकने के लिए हमारे देशभक्तो ने बलिदान दिया है। स्वतंत्रता संग्राम हुआ और शहीदों की बलिदानी के परिणामस्वरूप दशे स्वतंत्र हुआ। अब इसके नवनिर्माण का युग आया। हमारे नेताओं ने इसकी समृध्दी और प्रगती के लिए कार्य करना प्रारंभ किया।

मैं भी सपने लिया करती हूॅ कि मेरा देश अतीत की भाँति पुनः समृध्द और विकसित देश बने। वह पुनः सोने की चिडियाँ कहलाए। वह अमेरिका, जपान आदि देशों के भाँति विज्ञान और प्रौद्योगिकी के क्षेत्र में अपना नाम कमाए। किंतु इसके लिए परिश्रम, ईमानदारी, लगन और निष्का की आवश्यकता है। यदि मेरे देशवासी आलस्य, बेईमानी और स्वार्थ को छोडकर देश के निर्माण में काम करें तो देश की प्रगति हो कोई नही रोक सकता।

यह देश सदियों से विभिन्न जातियों, धर्मों और भाषाओं को एक साथ लेकर चलता आया है, अंतः हम सांप्रदायिक भावना के बीज पनपनेन दें। हम जाति, धर्म, भाषा, प्रांत के नाम पर आपस में न लडें। हममें एकता हो। एकता में ही बल है और यही देश को शक्तिशाली और समृध्द बना सकती है।

इस प्रकार मेरा यह सपना है कि मेरे देशवासियों मे साहस, प्रेम, दया, सेवा,सहिष्णुता, निःस्वार्थता और करूणा की भावना पैदा हो। सभी नवयुवकों को समान रूप से शिक्षा और रोजगार मे अवसर प्राप्त हो। उँच-नीच का भेदभाव न हो। सभी को रोजी, रोटी और मकान प्राप्त हो। तभी मेरा सपना साकार होगा।

**- सुमन नाना बोरूडे (टी.वाय. बी.ए.)**

न जाने सालों बाद कैसा समा होगा....
हम सब दोस्तों में से कौन कहा होगा....
फिर अगर मिलना होगा तो
मिलेंगे ख्वाबों में....
जैसे सुखे गुलाब मिलते है किताबों मे...

**- देव्हारे पल्लवी (टी.वाय. बी.कॉम.)**

# Father



*The corner stone of the family*
*A tower of respect and admiration*
*His wife at his side*
*His children before him*
*Lovingly cherished by his family*
*Though his words of wisdon and encouragement his children grow in knowledge and are blessed to have him.*
*Exercising right of authority to maintain peace, balance and harmony.*
*Guiding and instructing his little ones*
*Sacrificing his life for family.*
*Providing shelter and substance so that all may survive.*
*He contemplates and marvels at his greatest achievement a family, the monument to his life.*
*A great treasure without measure.*
*Protecting caring and nauturing his greatest asset for the benefit of his lineage.*
*Making sure that all is sfe*
*Till, he takes his last breath*
*Our friend,*
*Our father*
*His is our Dad*

***- Pramila Mahadev Kardile***
***(F. Y. B.Sc.)***

# मेरा सच्चा साथी...

कही देखा है तुमने उसे
जो मुझे सताया करता था..
जब भी उदास होता था मैं
मुझे हसाया करता था
एक प्यार भरा रिश्ता था हमारा
जो मुझे अब भी याद आता है
खो गया वक्त के भँवर में कही
जो हर पल मेरे साथ होता था ।

आज एक अजनबी की तरह हाथ मिलाना है,
जो उसके दिल की छोटीसी बात मुझे बताता था,
कही मिला वो मुझे किसी भीड पर
तो उसे मेरा संदेशा देना
कोई है जो आज भी उसका इंतजार करता है,
जिसको वो अपना सच्चा साथी बोला करता है ।

*Love you Friend*

– आकाश पासलकर (टी.वाय. बी.एस्सी.)

# Friendship



*Friendship is a type of relationship between two people who care about each other. But such a dry definition doen't do the concept of friendship justice. Consider these examples : A friend is the first person you want to call when you hear good news. A friend remembers that you don't like pickles on your sandwich. A friend will accompany you on the most boring of errands and make them seem fun.*

*In other words. Friendship is wonderful and much ink has been spilled in citing the virtues of having friends. That's not to say friendship is easy. Though It demands time and effort, and it requires that people put someone other than themselves first sometimes. But in exchange for that work, a friend can provide an immence amount of support and comfort in good times & in bad.*

*Many qualities are necessary for a good friendship, including honesty, trust worthiness, loyalty and unconditional acceptance. A friendship should make both people should have fun when they spend time together. Human beings can clash very easily. Which is why it's hard for some people to maintain many friendship.*

***- Renuka Janardhan Talekar (F. Y. B.Sc.)***

# आधुनिक व्याख्या



**विद्यालय** - अशी संख्या जिथे वडिल पैसे भरतात आणि मुले खेळत नसतात.

**अध्यापक** - एक अशी व्यक्ती ज्यांचे कोणीही ऐकत नाही तरी ते ज्ञान वाटत असतात.

**सिनेमा हॉल** - कॉलेजमधून पळून जाणाऱ्या विद्यार्थ्यांना लपण्यासाठी उत्तम ठिकाण.

**सिनेमा** - सासू आणि सून यांच्या भांडण्याची पूर्वापार चालत आलेली जागा.

**स्वप्न** - एक असा चित्रपट जो देव फुकटात दाखवतो.

**जेल** - बिन भाड्याचे घर

**शेजारी** - आवडता शत्रू

- अमित वारूळे, एफ.वाय. बी.कॉम.

# Friendship a Relation

*Friends are souls of life and one just cannot survive without its soul. Friends form a major part in everyone's life and paritically in youngster's lives they are the ones with whom they spend their atmost time. Sharing a hearlthy relationship with friends brings colors to your life and adds happiness even when the time is miserable your effort s are always in the direction of making your friendship heltheir and make sure thata it will sustain for long. There are certain things you tend to forget while taking these efforts. This article wishes to present you that will reassure you of establishing ever losting relationship with your cronies.*

*Long lasting friendship has many attributes which are very essential for bath of the friends to know and indulge because the relationship is mutual and you both are equally reponsible to make your relationship healthy. So here are some pointers that will aid you enhase the beauty of your relationship for years.*

***Trust** - Trust is an important face contributing to a good relationship you need to trust your friend all the time and also show it in every possible way to her.*

***Compatibility** - A compatible relation is the best relation of your life compatibility is what grooms your relationship and makes you feel yourself with your friend understand each other well to make your relationship attaned*




***Honesty** - Honesty is one of the prime traits you should adopt to maintain the beauty of your relationship Never cheat or lie to your friend.*

***- Amit Babasaheb Warule***
***F. Y. B.Com.***

## सुंदर विचार

दवाखाना म्हणतो अतिथीचे स्वागत कर
घड्याळ म्हणते काळाची पाऊले ओळख...
खिडकी म्हणते दुरदृष्टी ठेव, दुनियेचे भान ठेव...
देव्हारा म्हणतो पावित्र्य ठेव, मांगल्य ठेव...
छत म्हणते उच्च विचार ठेव, उच्च आंकाक्षा ठेवा...
पण जमीन....
म्हणजे पाऊल मात्र माझ्यावरच राहू देत...

– फंड ज्योती आसाराम (टी.वाय. बी.ए.)

# माणुसकी



एक भिकारी स्मशानात दोन जळालेल्या चिताची
असलेली राख मोठ्याटक लावून बघत होता
एकाने विचारले, बाबा असे का बघताहात तो म्हणालाही
एका श्रीमंताच्या चितेची राख आहे, ज्याने आयुष्यभर
काजू, बदाम खाल्लेत आणि दुसरी गरीबाच्या चित्तेची राख आहे
ज्याला दोन वेळचं अन्नही कस बसं मिळायचं परंतु
या दोघांची राख एक सारखीच आहे, मग माणसाला
पैसा जरुर कमवा पण माणुसकी ठेवून...

*यशस्वी कथा वाचू नका त्याने केवळ संदेश मिळतो*
*अपयशाच्या कथा वाचा, त्याने यशस्वी होण्यासाठी मार्ग मिळतो.*



*जीवनात त्रास त्यांनाच होतो जे जबाबदारी स्विकारतात*
*आणि जबाबदारी स्विकारणारे कधीच हारत नाही*
*एकतर जिंकतात किंवा काहीतरी शिकतात*


*आशा म्हणजे माणसाच्या आयुष्याचा मूळ/मुख्या आधार होय.*

*ज्यांचे ध्येय व्यक्तीगत जीवनापेक्षा उंच बनवते*
*त्याच्याकडून इतिहास निर्माण होतो.*

– प्रतिक्षा कांबळे
(एस.वाय. बी.एस्सी.)

*भविष्याची कोणत्याही प्रकारची कल्पना नसताना आपण*
*मोठ्या गोष्टीचे नियोजन करतो यालाच आत्मविश्वास म्हणतात.*

# टेन्शन घ्यायचंच नाही...



आयुष्य बिनधास्त जगायचे
कुणाचे वाईट करायचे नाही
कुणाच्या मागे वाईट बोलायचे नाही
फक्त स्वतःशी प्रामाणिक राहून जगायचं
काही कमी पडत नाही
आणि फरक तर अजिबात पडत नाही
कुणासाठी वाईट वाटून घ्यायच नाही
लोकांची विविध रूपे असतात
सकाळी गोड बोलतात आणि रात्री कुणी काही
डोळ्यात भरवले की तोंड पाडून बसतात
किंवा
कुठल्यातरी लहान कारणासाठी नाराज होऊन बसतात
ज्याच्याशी तुमचा काही संबंध पण नसतो
आजकाल लोक देवावर पण नाराज होतात तर तुम्ही कोण...
कुणी कितीही वाईट बोलो किंवा वाईट करण्याचा प्रयत्न करो
आपण त्याच्या विषयी तसेच इतरांविषयी चांगलेच
बोलायचे आणि चांगलेच वागायचे...
बोलण्यात स्पष्ट वक्तेपण ठेवायचा
कुणाच्या आयुष्यात डोकावयाचे नाही
फक्त स्वतःबरोबर दुसऱ्याचे हीत चिंतायचे
परमेश्वर काही कमी पडून देत नाही आणि
परमेश्वराची साथ तुम्हाला कायम मिळते
जिंदगी मस्तीत पण शिस्तीत जगायची
थंड पाणी आणि गरम इस्त्री जसे कपड्यावरच्या
सुरकुत्या घालवतात
तसेच शांत डोके आणि उबदार मन आयुष्यातील
चिंता घालवतात
नेहमी हसत रहा....



# पर्यावरण की पुकार



पेड काटने से पहले यह जरूर सोचो
किसी पंछी का इसपर रहता है बसेरा
इन्साान क्यों कर रहा है वृक्षों की हत्या
एक दिन उसे ही पछताना पडेगा ।
नही होगी बरसात तो गर्मी से होगा हैरान
पर्यावरण के क्रोध की सजा पायेगा इन्सान
हो रहा है प्रतिदिन पर्यावरण का नुकसान ।
महानगरों और कल-कारखानों के प्रदुषण से
हो रहा है दूषित जल, हवा एवं वातावरण
पेड लगाकर धरती का करने हेतू संरक्षण
मानव जाति को पुकार रहा है पर्यावरण ।।

– वामन भाग्यश्री दत्तात्रय
एफ.वाय. बी.कॉम.

# Logic



*No ine is the Reason of*
*your happiness except you yourself*
*Again hims*
*Don't compair your life with other*
*You have no idea what their*
*journey is all about*
*Smile you don't own*
*all the problems in the world.*
*Make peace with your past*
*So it doesn't spoil your present*
*Stop thinking too much*
*Its alright not to know all the Answer.*

***- Pratiksha Raosaheb Kamble (S. Y. B.Sc.)***

# राजगुरु महाराजांची कविता अहमदनगर

सर्वांहून वेगळा
असा आमचा जिल्हा ।।१।।
नाव त्याचे अहमदनगर
नाही मात्रा, वेलांटी वर ।।२।।
डिस्कव्हरी ऑफ इंडिया येथेच लिहला
येथेच औरंगजेबाचा मृत्युही जाहला ।।३।।
भंडारदऱ्याचा निसर्ग पाहुनी
मन जाते हरवून हरखुनी ।।४।।
येथेच वदली भावार्थ दिपीका
येथे राहिले प्रभूरामचंद्र सिता ।।५।।
शिर्डी, शिंगणापूरला जाऊ या
भक्तांची गर्दी पाहु या ।।६।।
गगणाला भिडली कळसुबाई
अहमदनगरची ध्वजा तिच्या डोई ।।७।।
पटवर्धन बंधू, बापट स्वातंत्र्याचे भक्त
त्यांच्या बाहुत होते याच भू चे रक्त ।।८।।
येथेच अशियातील पहिला साखर कारखाना
सहकारचा मंत्र उंचावतो माना ।।९।।

सुमन नाना बोरुडे (टी.वाय. बी.ए.)



# बेटी की पुकार



माँ के बदन में लेटी-लेटी सोचती है बेटी
सपनों में ही उडना और गगन की सैर करना
देखकर माँ का जीवन उदास होता है मन
माँ लगा दो पंख, उडने दो, देखना है मुझे गगन
लडकी हूँ तो क्या ? मुझे भी अरमान है
कोमल हूँ तो क्या ? मन में भी उमंग है
जमाने से क्या डरना ? निडर है अब मेरा मन
माँ, लगा दो पंख, उडने दो, देखना है मुझे गगन
माँ दुर्गा का रूप लेकर कर दूँ असुरों का दमन
मुक्त होकर तोड दूँ परंपरा के सारे बंधन
हरएक बेटी के माँ-बाप का क्यों भयभीत है मन ?
माँ, लगा दो पंख, उडने दो, देखना है मुझे गगन

- कराळे धनश्री रमेश (एफ.वाय. बी.कॉम.)

# आई आणि वडील

आ म्हणजे आत्मा, ई म्हणजे ईश्वर ।।
घरातच आहे परमेश्वर ।।
आई म्हणजे तव्यावरची गरम-गरम पोळी ।।
जशी काय गोड-गोड लेमनची गोळी ।।

कवी यशवंत म्हणतात, ''स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी'' खरेच आहे ते तिन्ही जग पृथ्वी, स्वर्ग आणि पाताळ यांचा स्वामी असला पण त्याला आईच नसेल तर त्याचे जीवन दुःखीच असायचे आईची माया अगाध व अनमोल आहे. एखादी भिकारीन चार घरं हिंडुन जो ओला-कोरडा तुकडा मिळतो तो आधी ती बाळाला भरवते व उरल्यास स्वतः खाते.

आईची माया ज्या प्रमाणे मानवात असते त्याचप्रमाणे पक्ष्यांसाठी असते. कोंबडी जेव्हा आकाशातील घार पाहते तेव्हा ती आपली पिले पंखाखाली घेते.

घार हिंड आकाशी ।
चित्त तिचे पिलांपाशी ।।

घार जरी आकाशात हिंडत असली तरी तिचे लक्ष्य तिच्या पिल्ल्यांपाशीच असते.

बाळाचा पहिला गुरु म्हणजे आई ! शंभर शिक्षकांपेक्षा एक आई त्या बाळासाठी श्रेष्ठ असते. शंभर शिक्षकांचे एकूण एखादी गोष्ट बाळ करते परंतु आईच्या एका शब्दांवर बाळा विश्वास ठेवते. आईची माया आईच्या एका शब्दांवर बाळ विश्वास ठेवते. आईची माया जेवढी अगाध आहे. तेवढेच अनमोल वडिलांचे प्रेम.

सर्वच म्हणतात फुलांत फुल जाईचे, जगात प्रेम आईचे त्यावेळी असे देखील म्हणायला हवे फुलात फूल चाफ्यांचे जगात प्रेम बापाचे.



वडिल मुलाचे दुसरे गुरु । खरे पाहता मला वाटते बाळावर आईपेक्षा जास्त प्रेम वडिलांचे असावे का ? ऐ काना आई घरांच मांगल्य असते तर वडिल घराचं अस्तित्व असतात. आईकडे अश्रुंचे पाठ असतात वडिलांकडे सयंमाचे घाट असतात. आई रडून मोकडी होते पण सांत्वन वडिलांनाच करावे लागते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आपल्याला लक्षात राहते पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारे वडिल आपण सहज विसरतो. सर्वांसमोर आई मोकळ्या पणाने रडू शकते पण उशीत तोंड खुपसून रडणारे ते वडिल असतात. परीक्षेचा निकाल लागल्यावर आई मुलांना जवळ घेते व कौतुक करते पण  गुपचुप जाऊन पेढ्याचा पुडा आणणारे वडिल कोणाच्या लक्षात राहत नाही देवकीचे यशोदेचे कौतुक अवश्य करावे पण पुरातून पोराला डोक्यावर घेऊन जाणारा वासुदेव सुध्दा लक्षात ठेवावा. राम हा कौशल्येचा पुत्र अवश्य असेल पण वियोगाने तडफडून मरणारा पिता दशरथ होता. जिजाऊ माँ साहेबांनी शिवाजी घडवला असे अवश्य म्हणावे पण त्याचवेळी शहाजी राज्याची ओढाताण सुध्दा लक्षात घ्यावी तर पृथ्वी पेक्षा श्रेष्ठ आई असेल तर स्वर्गांपेक्षा श्रेष्ठ वडिल असतात.

**- स्वाती शिवाजी वाघ (एस.वाय. बी.ए.)**

# मैत्रीचं नात...

आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला साथ देणारे मित्र मैत्रीण मिळणं ही भाग्याचीच गोष्ट आहे. आपल्यातील उणीवासह आपला स्वीकार करणार मैत्रीचं नातं हे आयुष्यातील ताण तणावावर रामबाण औषध असतं. अशा घट्ट मैत्रीच्या जोरावर पर्वताएवढ्या संकटातही उभं राहण्याची ताकद मिळते.

जिथे मैत्री असते तिथे सर्व प्रथम त्याग हा असतोच आपल्या जवळच्या मित्रासाठी जेव्हा आपण एखादे दुःख त्याच्या नकळत सहन करतो. तेव्हा ते दुःख वाटतचं नाही.

नियती मित्र मैत्रिणींनी कधी जास्त काळ एकमेकांच्या सहवासात राहू देत नाही ही हे सांगण्याच धाडस स्वानुभवातून करतेय. मित्र जितके दूर तितकी मैत्री घट्ट हे ही अनुभावाचेच बोल. माझ्या आयुष्यात नियतीने मला नेहमीच माझ्या जीवलग मैत्रिणीपासून दूर नेलं. मी त्यांना खूप मीस करते. हा लेख नसून माझ्या मैत्री विषयीच्या भावना आहेत. प्रेमातही मैत्री हवी असते.

वयात आल्यावर आपल्याला समजून घेणारे मित्र मैत्रीणी आपल्याला हवे असतात. ज्या गोष्टी आई–वडिलां बरोबर बोलता येत नाहीत. त्या गोष्टी शेअर करायला कोण असतं ? आपली गुपीत पोटात साठवणारं विश्वास टाकता येईल. सुरक्षित वाटेल अस नातं कळत न कळतपणे मैत्रीत शोधलं जातं अगदी लहानपणी बरोबर खेळणारे, आपल्या चुकांची जाणीव करून देणारे आणि मदतीचा हात पुढे करणारे आपले मित्र–मैत्रिणीच असतात.



पुढं माणूस म्हणून परिपक्व घेताना आपलं जगण समजून घेणारा आपली व्हिजन शेअर करणारा मित्र यावेळी हवासा वाटतो. मित्राच्या चुका समजून घेणं म्हणजे मान्य करणं नाही तर त्या स्वीकारून चुका दुरुस्त करायला त्याला मदत करणं असा त्यातला भावार्थ आहे. मित्रांची साथ संगत आपल्या बरोबर कुणीतरी आहे ही आश्वासक भावना मनात निर्माण करते. धकाधकीच्या जीवनात ताण–तणावांना सामोरं जाताना येणारी एकटेपणाची जाणीव मित्रामुळेच तर कमी होते ना ? कुठंतरी वाचनात आल होत की..

***Life is visiting card***
***Parents are pan card***
***Husband is ATM card***
***Wife is debit card***
***Child is indentity card***
***Love is post card***
***But a friend is Adhar card***

हर जगह पे, हर हालात मे आपके काम आएगा।

आताच्या स्पर्धेच्या काळात तर मित्र आधार स्तंभ वाटतात. स्वतःसाठी वेळ नाही.

# जन्म घेईन आई तुझ्याच पोटी



खुप कष्ट घेतलेस आई खूप घेतलास त्रास,
दारिद्रय तर फिरकलेच, नाही आमच्या आसपास,
नाही कमी पडली, आम्हांला शिक्षणाची पाटी
नाही कमी पडली, कधी जेवणात तूप रोटी
काबाड कष्ट करण्याचा, तू घेतला होतास ध्यास,
स्वतः उपाशी राहून, आम्हांला भरवत होतीस घास,
तुझ्या स्पर्शाने होतो, मला नेहमीच देवाचा भास,
असू शकतो का गं देव, वाहुनी वेगळा खास,
एकच खंत राहिल आता, नेहमी माझ्या मनात
म्हातारपणात देऊ शकणार, नाही तुला मी साथ
नाही होऊ शकणार, तुझ्या आधाराची काठी
म्हातार वयात सोडून, चालले तुला मी एकटी
खूप प्रयत्न केला पण, अंगात नाही राहिला त्राण,
कॅन्सर ने या मला, केलाय पुरताच हैराण,
कोणत्याही क्षणी जाऊ,  शकतात आता माझे प्राण
यमराज पुढे उभे, घेऊनी त्यांचे पाहण
देवाघरी जाऊन करेन, प्रणाम कोटी कोटी
कितीही जन्म लागले तरी, वाट पाहिन तुझ्याचसाठी
फुल, दुर्वा, खणा-नारळाने, भरेन देवाची ओटी
पुन्हा एकदा जन्म घेईन, आई फक्त तुझ्याच पोटी
आई फक्त तुझ्याच पोटी

कराळे धनश्री रमेश
एफ.वा. बी.कॉम.



# लक्षात नसलेला बाप...



वडिल, बाबा, पिता लिहण्यास खूप चांगलं वाटत पण आपण जाणून बुजून शब्द उच्चारतो तो म्हणजे बाप... बाप होय बाप ! त्याच बापाविषयी काही.

आई घराच मांगल्य असते तर बाप घराचं अस्तित्व पण खरंच या अस्तित्वाला कोणी समजून घेतलयं का ? वडिलांना महत्व असून त्यांच्या विषयी जास्त बोललं जात नाही, लिहलं जात नाही, कोणत्याही व्याख्या ता, आई विषयी जास्त वेळ बोलत बसतो. संत महंतांची आईच महत्व अधिक सांगितले आहे.

देवाधिकांनी आईच कौतुक तोंड भरून केलं चांगल्या गोष्टींना आईची उपमा दिली जाते पण बापाविषयी कुठंच काही बोललं जात नाही. लोक बाप रेखाटतात पण तोही तापट, व्यसनी, मारतोड करणारा. समाजात एक दोन टक्के बाप असे असतील पण चांगल्या वडिलांविषयी काय ?

आईकडे अश्रुंचे पाट असतात तर बापाकडे सयंमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते पण सांत्वन करणारावर जस्ता ताण पडतो कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापते, ना पण श्रेय मात्रे ज्योतीलाच मिळते.

रोजचा जेवण करणारी आई लक्षात राहते पण शिदोरीची सोय करणारा बाप आम्ही किती सहज विसरून जातो. आई रडते पण बापाला रडता येत नाही. स्वतःचा बाप मेला रडता येत नाही कारण भावंडांना जपायचं असतं. आई गेली तरी रडता येत नाही कारण बहिणींचा आधार व्हायचा असतो. पत्नी अर्ध्यावर सोडून गेली तरी अश्रुंना आवर घालावा लागतो.

कोणताही बाप श्रीमंत मुलींच्या घरी जास्त जात नाही पण गरीब मुलीच्या घरी उभ्या-उभ्या का होईना चक्कर मारतो. तरूण मुलगा उशिरा घरी येतो तेव्हा त्याचा बापचं जागा असतो. मुलींच्या नोकरीसाठी साहेबांकडे लाचार होणारा बाप मुलींच्या उंबरठे झिझवणारा बाप घरासाठी स्वस्तच्या व्यथा दडवणारा बाप खरचं किती ग्रेट असतो ना ?

लहानपणी बाप गेल्यावर अनेक जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात. त्यांना एका एका वस्तुसाठी तरसावं लागतं वडिलांना समजून घेते ती त्या घरची मुलगी वडिलांना जाणते. जपते.

इतरांनी सुध्दा किमान आपल्याला जाणावं हेच प्रत्येक बापाला वाटतं.

**- फाटक ऋतुजा अनिल (एफ.वाय. बी.एस्सी.)**

# यश

मनाभोवती स्वप्नांचे थवे
अखंड भिरभिरत असतात
स्वप्नांना रोज नवे अंकुर फुटतात
आजवर इतर जे कुणीही केलेले नाही
असे काहीतरी जगावेगळे विलक्षण करण्याची
ओढ असते.

स्वप्न नुसती मोठी असून चालत नाहीत, तर त्या स्वप्नां हवी निश्चित दिशा आणि प्रयत्नांना हवेत योग्य मार्ग आणि नजर केंद्रित हवी फक्त तुमच्या लक्ष्यावर. कारण –

'स्वप्न असतील तर
ध्येय असतं आणि
ध्येय असेल तरच ध्यास !'

त्यातूनच स्वप्न वास्तवात उतरतात हाताशी येतात. खरी होतात, म्हणून –

'स्वप्न कधी खुजी नसावी,
आभाळाएवढी उंच असावी
कारण आपल्या विचारांचं प्रतिबिंब
हे स्वप्नात पडलेलं असत.'

यश मिळवणं तस कुणालाच अवघड नसतं. हव्यात फक्त दोन गोष्टी 'शिस्त' आणि 'थोडा निग्रह' आपले यश आणि अपयश हे आपल्या विचार करण्याच्या प्रक्रियेशी निगडीत असते. ध्येयापासून मिळालेली प्रेरणा शावून राहते तर तुमचे विचार पक्के आणि स्पष्ट असतील तर !

स्वप्न जशी मोठी हवीत त्याचप्रमाणे त्या स्वप्नांपर्यंत पोहचण्याचे मार्गही वेगळे निराळे आणि आजवर कुणीही आजमावून न पाहिलेले हवेत. आपल्याला जर यश मिळवायचे आहे तर –

१. माझे स्वप्न कोणते ?




२. त्यासाठीचा ध्यास कमी झालाय का ?

३. माझ्या ध्येयपूर्तीसाठी मी आजवर काय–काय केले आहे आणि मला अजून काय–काय करायचे आहे ? या प्रश्नांचे उत्तर शोधा.

मानसिक स्तरावर यशस्वी होणारच ! हा निश्चय असेल 'बौध्दीक पातळीवर' त्यासाठी आखले गणिते 'पक्की असतील' आणि भविष्यात मिळणाऱ्या यशाच्या अंदाज बांधता येत असेल तर यश मिळणारच !

**– सुमन नाना बोरूडे**
**टी.वाय. बी.ए.**

*** आयुष्यात दोन व्यक्तींची खूप काळजी घ्या...**

**१. तुम्ही जिंकण्यासाठी स्वतः आयुष्यभर हरत राहिले ते – बाबा.**

**२. तुमच्या हरण्याला सतत जिंकणं मानत आली ती – आई.**

**– तेलधुणे एलिझाबेथ योसेफ**
**एस.वाय. बी.एस्सी.**

# दुष्काळ



दुष्काळ... दुष्काळ... दुष्काळ...
सर्वांच्या तोंडावर फक्त हेच एक नाव
यात होरपळून निघालेले मात्र शेतक्यांचे गाव
मांडला हा दुष्काळाने महागाईचा विचित्र बाजार
त्यामुळे शेतकऱ्याला जडला आत्महत्येचा आजार
दुष्काळाने गेला काळ्या धरत्रीला तडा
अन् व्यापारी सांगतात आता प्रत्येक गोष्टींसाठी नडा
दुष्काळानं पळवलयं सर्वांच्या तोंडावरचं हसू
आणि आभाळातील 'मेघ' म्हणतात आता आम्ही रुसू
ना कळते कुणा त्यांच्या ह्या जीवनाची व्यथा
करतील काय ते तरी, आड येते त्यांना प्रथा
थेंब थेंब पाण्यावाचून झाले अनेकांचे हाल
अन् एकीकडे व्यापारी बांधतायेत करोडोंचे महाल
शेतकरी झालेत सावकारांच्या हवाली
कशी साजरी करतील मग ते दिवाळी
शेती करणारा शेतकरी करू लागला आत्महत्या
बरस रे पाऊस राजा तरंच मिळेल त्यांना मुक्तता



– शिरसाठ सतिश बंडू (एस.वाय. बी.सी.एस.)



एखादं स्वप्न पाहणं
ते फुलवणं...
ते सत्यात उतरावं म्हणून धडपडनं
त्या धडपडीतला आनंद लुटणं आणि....
दुर्दैवाने ते स्वप्न भंग पावलं
तरी त्याच्या तुकड्यावरून
रक्ताळलेल्या पायांनी दुसऱ्या स्वप्नामागे
धावणं, हा मानवी जीवनाचा धर्म आहे.
मनुष्याच्या जीवनाला अर्थ येतो
**तो यामुळेच....**

– तेलधुणे एलिझाबेथ योसेफ
(एस.वाय. बी.एस्सी.)

# मराठी विभाग अहवाल



श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे, श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बुऱ्हाणनगर, अहमदनगर या महाविद्यालयाची स्थापना सन २००४–०५ या शैक्षणिक वर्षात झाली. या महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच महाविद्यालयामध्ये मराठी विभाग अस्तित्वा आहे. सन २००५–०६ पासून मराठी हा विषय विशेषस्तरावर चालू करण्यात आलेला आहे. या विभागाच्या वतीने सतत अभ्यासक्रमाव्यतिरिक्त नेहमीच वेगवेगळे उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

शैक्षणिक वर्ष २०१६–१७ या वर्षाचे सर्व वर्गांचे निकाल उत्कृष्ट लागले आहेत. प्रथम वर्ष बी.ए. या वर्गात मराठी विषयास १३२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. त्यापैकी परीक्षेस १२६ विद्यार्थी बसले. त्यापैकी सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तसेच एस.वाय. बी.ए. ला मराठी हा विषय विशेष स्तरावर चालविला जातो. या विषयाला एकूण २५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. त्यात सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तसेच टी.वाय. बी.ए. ला २१ विद्यार्थींनी प्रवेश घेतला. त्यापैकी १८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले.

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मध्ये प्रथम वर्ष बी.ए. ला १४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. द्वितीय वर्षाला २६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर तृतीय वर्ष बी.ए. मराठी विशेष स्तरावर २५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. हे सर्व विद्यार्थी नियमितपणे महाविद्यालयात येतात व त्यांचा अभ्यासक्रम नियमितपणे व वेळेवर पूर्ण झालेला आहे.

अभ्यासक्रमाव्यतिरिक्त महाविद्यालयात व मराठी विभागाच्या वतीने नेहमीच विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. १ जुलै २०१८ रोजी प्रथम वर्ष बी.ए. च्या विद्यार्थ्यांचे स्वागताचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर ५ सप्टेंबर २०१७ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती म्हणजेच शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील व विभागातील सर्व विद्यार्थी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय जाधव, कला शाखा प्रमुख डॉ. भाऊसाहेब मुळे व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या वतीने प्राध्यापकांना विविध चर्चासत्रे, कार्यशाळा यास पाठविले जाते. मिरजगाव महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्रात प्रा.डॉ. मुळे बी.एम. व प्रा. डॉ. वर्षा कीर्तने यांनी संत साहित्याचे सामाजिक योगदान या विषयावर शोध निबंधाचे सादरीकरण केले तर श्रीगोंदा महाविद्यालय राष्ट्रीय चर्चा सत्रामध्ये प्रा.डॉ. मुळे बी.एम. यांनी शोधनिबंध सादर केले.

२७ फेब्रुवारी, २०१८ रोजी मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी हजर होते. यात विविध विद्यार्थ्यांनी मराठी भाषेची महतीवर भाषणे केली तसे काव्यवाचन स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. या व्यतिरिक्त विविध उपक्रम मराठी विभागाच्या वतीने चालविले जातात. तसेच विद्यापीठाच्या वतीने नेमून दिलेल्या अभ्यासक्रमावर नियमितपणे अध्यापन केले जाते.

**मराठी विभाग प्रमुख, प्रा. डॉ. भाऊसाहेब मुळे**

## Department of English

*The department of English and the faculty has been working intentionally for the enhancement of student's linguistic and literary skill. In order to cop up with a teaching - learning and evalution process, the first year stdudents of UG were availed the bridge course. Apart from regular teaching, we have imparted knowledge to students in various ways including seminars, unit test, group discussion, question paper solving, power point presentations, Project based learning, screening of the film etc. Remedial teaching was done for the weak students.*

*The department organised a guest lecture on communication skills for the students which will become most helpful to their employability in this global world. Due to the continous encouragement and guidance of Hon. Prin. Dr. V. M. Jadhav. We are marching towards excellence.*

**Prof. Khollam M. C.**
**Head Dept. of English.**

## इतिहास विभाग अहवाल २०१७-१८

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ साली झाली आणि तेव्हापासून इतिहास विभाग कार्यरत आहे. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी गुणवत्ता वाढीसाठी आणि विद्यार्थ्यांमधील संभाषण कौशल्य आदी गुण विकसित होण्याच्या दृष्टीने इतिहास विभागातर्फे गट चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. व्यक्तीमत्व विकासासाठी व्याख्यानाचे आयोजन केले गेले त्या माध्यमातून भविष्यात येणाऱ्या सर्व अडचणींना धैर्याने सामोरे कसे जावे, स्वसंरक्षण कशा प्रकारे केले जावे हे सांगण्याचा प्रामुख्याने प्रयत्न केला. जो आजच्या काळामध्ये आवश्यक आहे.

इतिहास विभागाच्या वतीने विविध चर्चासत्रामध्ये इतिहासाचे प्राध्यापक सहीागी होतात. महिला महाविद्यालयातील चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला. इतिहास विभागातर्फे विद्यार्थी व्यक्तीमत्व विकासाच्या प्रयत्नाबरोबरच सावित्रीबाई फुले जयंती, स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने इतिहास विभागांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. त्या मार्फत त्यांच्या जीवन चरित्राचा पट मांडण्यात आला. त्यामध्ये या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले

**प्रा. सोनवणे एस.आर.**
**इतिहास विभाग प्रमुख**

## समाजशास्त्र विभाग अहवाल २०१७-१८

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाद समाजाशास्त्र या विषयाची सुरुवात जून २००४ पासून झाली. महाविद्यालयात समाजशास्त्र हा विषय सामान्य स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष या वर्गात कला शाळेअंतर्गत शिकवला जातो. सन २०१२-१३ पासून महाविद्यालयात समाजशास्त्र हा विषय विशेष स्तरावर शिकविण्यास सुरुवात झाली. सन २०१२-१३ पासून महाविद्यालयात समाजशास्त्र हा विषय विशेष स्तरावर शिकविण्यास सुरुवात आली. सन २०१२-१३ मध्ये २० विदयार्थ्यांनी प्रवेश घेतला तर आज प्रथम वर्ष कला शाखेत १४४ विद्यार्थी २०१७-१८ मध्ये प्रवेश घेतलेला तर द्वितीय वर्षांसाठी विशेष स्तरावर २२ विद्यार्थी आहेत तर तृतीय वर्षांसाठी १९ विद्यार्थी समाजशास्त्र विषयाला प्रवेश घेतलेले आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान, सामाजिक जाणिव जागृती व्हावी म्हणून विविध व्याख्याने आयोजित केली जातात. तसेच स्नेहालय, बालसुधारगृह या ठिकाणी समाजशास्त्र विभागाचे विद्यार्थी भेटी देवून अहवाल तयार करतात.

**प्रा.डॉ. विजय जाधव**



## भूगोल विभाग अहवाल २०१७-१८

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बुऱ्हाणनगर या महाविद्यालयाची स्थापना २००४-०५ साली झाली. महाविद्यालयामध्ये भूगोल विभाग स्थापनेपासून कार्यरत आहे. विभागाच्या वतीने नवनवीन उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये पर्यावरण चळवळ, वाढती लोकसंख्या, साक्षरता अभियान वृक्षारोपण व विविध तज्ञ व्यक्तीची व्याख्याने आयोजित केली जातात.

भूगोल विभागामध्ये विविध तज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित केली जातात. त्यामुळे विषयाचे ज्ञान वाढून स्पर्धा परीक्षेसाठी उपयोग होत आहे. काही विदयार्थी एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी. परीक्षेमध्ये यश मिळविण्यासाठी भूगोल विषयाचा अभ्यास महत्वाचा मानला गेला आहे.


भूगोल विभागातर्फे या वर्षी १४ जानेवारी २०१८ रोजी भूगोल दिन साजरा केला. यामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले.पर्यावरण वाचवा... देश घडवा.., भित्ती पत्रिका स्पर्धा, कन्या अभियान, नकाशा वाचन व माहिती घेण्यात आली.

या शैक्षणिक वर्षामध्ये द्वितीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान यामध्ये विद्यापीठांतर्गत पर्यावरण शास्त्र हा विषय सक्तीचा असून यामध्ये विविध विषय देऊन पर्यावरण पूरक माहिती विद्यार्थ्यांकडून तयार केली जाते. त्यामुळे समाजामध्ये पर्यावरणाविषयी आवड निर्माण होण्यास मदत होत आहे. यामध्ये प्राणी निरीक्षण, ग्रामीण विभाग, शहर विभाग इ. विषय दिले जातात त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये भूगोल विषयामध्ये चांगले यश संपादन करून विषयाचा १००% निकाल आहे. अशा प्रकारे भूगोल विभाग महाविद्यालय कार्यरत आहे.

**प्रा. साठे बी.जी. भूगोल विभाग**


## राज्यशास्त्र विभाग अहवाल २०१७-१८



श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र हा विषय सुरु करण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये मान्यता देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून महाविद्यालयात राज्यशास्त्र हा विषय शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये एफ.वाय. बी.ए., एस.वाय. बी.ए. व टी.वाय. बी.ए. साठी राज्यशास्त्र विषय अभ्यासण्यास आहे. राज्यशास्त्र विषयासाठी प्रथम वर्षाचे ५२ विद्यार्थी. द्वितीय वर्षाचे २८ विद्यार्थी व तृतीय वर्षाचे २९ विद्यार्थी प्रवेशित आहेत.

राज्यशास्त्र विषयाचा विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी तसेच राजकिय क्षेत्रातील माहितीसाठी उपयोग होतो. राज्यशास्त्र विभागात मतदार नाव नोंदणी सारखे कार्यक्रम राबवले जातात. या मतदार नाव नोंदणी कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात नावनोंदणी केली आहे. विभागामार्फत 'संविधान दिवस' साजरा करण्यात आला. राज्यशास्त्र विभागास प्राचार्य डॉ. व्ही. एम. जाधव यांचे नेहमीच मोलाचे मार्गदर्शन लाभते.

**- प्रा. खांदवे एस.टी.**



## वाणिज्य विभाग अहवाल २०१७-१८

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००५-०६ पासून वाणिज्य पदवी अभ्यासक्रम कार्यरत असून या विभागांतर्गत प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष व तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमातून विपणन व्यवस्थापन व कॉस्ट ॲण्ड

वर्क्स अकौंटिंग हे स्पेशल विषय शिकविले जातात.

प्रथम वर्षापासून वाणिज्य शाखेचे सर्व वर्गांचे निकाल अपेक्षेपेक्षा अधिक समाधानकारक असून आता प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येत अमुलाग्र वृध्दी झालेली आहे. या विभागांतर्गत व्यावसायिक विद्याशाखेमध्ये सुध्दा प्रवेश दिले जातात.

वाणिज्य पदवी मिळाल्यानंतर नोकरी अथवा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासाठी व्यावसायिक तसेच संबंधित क्षेत्रातील तज्ञ मंडळींना आमंत्रित करुन चर्चासत्रे घेतली जातात. तसेच या ठिकाणी निरनिराळ्या स्पर्धांचे आयोजन केले जाते.

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होऊन भविष्यात त्यांना सर्व अडचणींना धैर्याने सामोरे जाण्याचे मनोबल या विभागामार्फत पुरविण्याचे काम विभागातील सर्व संबंधित शिक्षण वर्ग सातत्याने करत असतात

**– प्रा. गाडे त्रिवेणी ज्ञा.**
**वाणिज्य विभाग प्रमुख**

## अर्थशास्त्र विभाग
## अहवाल २०१७-१८



श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र हा विषय कला व वाणिज्य शाखेत शिकवला जातो. वाणिज्य शाखेत प्रथम व द्वितीय वर्षांसाठी व्यावसायिक अर्थशास्त्र व तृतीय वर्षासाठी भारत आणि जागतिक अर्थशास्त्र तसेच भारत आणि जागतिक अर्थरचनेचा विकास हे विषय शिकवले जातात.

सन २०१३-१४ मध्ये कला शाखेमध्ये प्रथमच अर्थशास्त्र हा विषय सुरु झाला व नंतर सन २०१४-१५ मध्ये द्वितीय वर्ष कला शाखेत अर्थशास्त्र हा विषय सुरु करण्यात आला व नंतर सन २०१५-१६ मध्ये तृतीय वर्षामध्ये हा विषय सुरु करण्यात झाला. अर्थशास्त्र विषयाबद्दल विद्यार्थ्यांना आवड निर्माण झालेली दिसते. कारण एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी. स्पर्धांपरीक्षांसाठी अर्थशास्त्र विषय महत्वाचा मानला जातो. तसेच अर्थशास्त्र विषयाला चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळाला.

**– प्रा. जाधव के. एस.**

## बी. सी. एस. विभाग
## अहवाल २०१७-१८



श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बी.सी.एस. अभ्यासक्रमाची सुरुवात शैक्षणिक वर्ष २००८ पासून करण्यात आली.

बी.सी.एस. विभागातील तृतीय वर्ष मुलांसाठी टीसीएस सारख्या नामांकित कंपनीमधील मिलिंद सोनवणे व त्यांच्या टीमने "Online exam & interview" च्या तयारीबाबत मार्गदर्शन पर व्याख्यानाचे आयोजन केले होते.

सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना विषयज्ञान चांगले मिळण्यासाठी विविध गेस्ट लेक्चर आयोजित करण्यात आले.

विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच स्पर्धा परीक्षेंचेही ज्ञान देण्यासाठी विविध मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांसाठी अदयावत संगणक लॅब उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये हाय प्रोसेसर चे

कॉम्प्युटर, उच्च प्रतिचे प्रिन्टर्स तसेच बॅकअप साठी यु.पी.एस. व १६ एक्साइड बॅटरी उपलब्ध करून देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी ब्रॉडबॅण्ड सुविधा पुरविण्यात आली. विद्यार्थ्यांप्रमाणेच प्राध्यापकांच्या नवीन टेक्नोलॉजी अवगत होण्यासाठी विविध वर्कशॉप, सेमिनार इ. मध्ये पाठविण्यात आले.

हे सर्व करण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

**प्रा. काळे व्ही.ए. – बी.सी.एस. विभाग**

---

# भौतिकशास्त्र विभाग अहवाल २०१७-१८




श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना सन २००४ मध्ये झाली. श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून बी.एस्सी. हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आली. त्या अंतर्गत भौतिकशास्त्र हा प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी शिकविला जातो. भौतिकशास्त्र या विषयाबद्दल मुलांमध्ये गोडी निर्माण होत आहे आणि त्यामुळे विद्यार्थी संख्येत वाढ झाली.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात भर देण्यासाठी विविध प्रकारचे उपकरणे व विषयाशी निगडीत असणाऱ्या साहित्यांनी प्रयोगशाळा सुसज्ज आहे. तसेच मुलांच्या शैक्षणिक बुध्दीत वाढ करण्यासाठी प्रयोगशाळेत संगणक सुविधा उपलब्ध आहे.

प्रा. लोखंडे डी.जे. व प्रा. आरसुळे ए.सी. यांनी अविष्कार या पुणे विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदविला. हे सर्व करताना संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व शिक्षक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**प्रा. आरसुळे ए.सी., प्रा. लोखंडे डी.जे.**
**भौतिकशास्त्र विभाग**

---



# रसायनशास्त्र विभाग अहवाल २०१७-१८

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना सन २००४ मध्ये झाली. आरंभी फक्त कला व वाणिज्य या दोन शाखा कार्यरत होत्या. मात्र त्यानंतर वाढती विद्यार्थी संख्या व विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता. सन २०१३-२०१४ मध्ये विज्ञान शाखा सुरु करण्यात आली.

नैसर्गिक वाढीने हाच वर्ग टी.वाय. बी.एस्सी. पर्यंत गेला आणि या वर्गात विशेष स्तरावर रसायन शास्त्र हा विषय सुरु करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रथम वर्ष बी.एस्सी या वर्गात १४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर द्वितीय वर्षात ८६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आणि तृतीय वर्षात ४७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करण्यासाठी महाविद्यालयाने सुसज्ज अदयावत व सर्व सुविधांयुक्त अशी प्रयोगशाळा तयार केली आहे. या विषयाचे प्रात्यक्षिक वेळेवर पूर्ण झालेले आहेत.

तसेच अध्यापनासोबत महाविद्यालयातील प्राध्यापक महाविद्यालयीन उपक्रमांमध्ये भाग घेतात. विविध महाविद्यालयामध्ये होणाऱ्या चर्चासत्रास संशोधन परिषद कार्यशाळेस उपस्थित राहतात.

**प्रा. मोहिते सी. पी. (बी.एस्सी. रसायन शास्त्र विभाग)**

# वनस्पतीशास्त्र विभाग वार्षिक अहवाल २०१७-१८



श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ साली झाली. त्यानंतर सन २०१३-१४ पासून विज्ञान शाखेला सुरुवात झाली. तेव्हापासून वनस्पतीशास्त्र हा विभाग महाविद्यालयामध्ये कार्यरत आहे. यामध्ये प्रथम वर्षापासून, द्वितीय वर्षापर्यंतचे वर्ग कार्यरत आहेत.

या विषयासाठी प्रथम वर्षाचे ९४ विद्यार्थी व द्वितीय वर्षाचे ३७ व तृतीय वर्षाचे ०५ विद्यार्थी प्रवेशित आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात वाढ करण्यासाठी अद्यावत प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्यात आली. त्यामध्ये उत्कृष्ठ प्रतीचे मायक्रोस्कोप, स्लाइड, चार्टस् तसेच उच्च दर्जाचे उपकरणे व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे नविन संशोधन कार्यात विकास होण्यासाठी प्राध्यापकांना विविध परिषदा व कार्यशाळेला पाठविण्यात आले. तसेच या वर्षी विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमातील प्रकल्पासाठी शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. वनस्पतीशास्त्राचा सखोल अभ्यास करण्यासाठी वनस्पतीशास्त्र उदयानाची चांगली निर्मिती करण्यात आली.

हे सर्व करतांना प्रा. वाघ एस.डी., प्रा. वैदय सी.आर. आणि प्रा. मेहेत्रे एस.ए. तसेच संस्थेचे पदाधिकार, प्राचार्य व सर्व शिक्षक यांचे सहकार्य लाभले.

**– प्रा. वाघ एस.जी., वनस्पती शास्त्र**

# प्राणीशास्त्र विभाग अहवाल २०१७-१८

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ पासून झाली. त्यानंतर सन २०१३-१४ पासून विज्ञान शाखेला सुरुवात झाली. तेव्हापासून प्राणीशास्त्र हा विभाग कार्यरत आहे.

या विभागांतर्गत प्रथम वर्षांपासून द्वितीय वर्षापर्यंतचे वर्ग कार्यरत आहे. त्यानुसार सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षात प्राणीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात भर घालण्यासाठी अदयावत प्रयोगशाळा व त्यामध्ये विदयार्थ्यांसाठी आवश्यक ती उपकरणे व साधने त्याचप्रमाणे प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक ती प्राण्यांच्या संबंधित नमुने आहेत. अशा प्रकारे प्राणीशास्त्र विभागाची प्रयोगशाळा सुसज्ज आहे.

विद्यार्थ्यांची प्राणीशास्त्र त्याचप्रमाणे आत्मबल वाढविण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकांना व्याख्यान व त्याचप्रमाणे राष्ट्रीय पातळीवर परिषदेला पाठविण्यात आले. चालू असलेल्या शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्राध्यापक बीगरे एस.डी. व प्राध्यापिका लहारे एन.टी. विद्यार्थ्यामध्ये गोडी निर्माण केली.

येणाऱ्या वर्षातही प्राणीशास्त्र विभागाची यश संपादन करण्यामागे सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, प्राचार्य व उपप्राचार्य सहयोग राहिल. यश संपादन करण्याची कार्यपध्दती चालू ठेवेल व विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देईल.

अशा प्रकारे प्राणीशास्त्र विभाग महाविद्यालय कार्यरत आहेत.

**– प्रा. लहारे एन.टी. प्राणीशास्त्र**

## हिंदी विभाग अहवाल २०१७-१८

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय में २००४-०५ से हिंदी विभाग कार्यरत है । २०१२-१३ से विशेष स्तर पर यह विषय पढाया जाता है । हिंदी विषय में छात्रों की रुचि निर्माण होने के लिए समय-समय पर व्याख्यानों का आयोजन महाविद्यालय में किया जाता है । हिंदी विशेष स्तर पर पढनेवाल विद्यार्थीयोंको कौन-कौन से क्षेत्र मे नोकरी करने के अवसर प्राप्त हो सकते है, इसके बारे में मार्गदर्शन किया जाता है ।

महाविद्यालय में हरवर्ष १४ सितंबर हिंदी दिवस के रुप में मनाया जाता है । इस वर्ष भी इसका आयोजन किया गया था ।

महाविद्यालय के अध्यापक हर वर्ष अलग-अलग महाविद्यालयों में संगोष्टी में संम्मिलित होते है । इस वर्ष भी राधाबाई काले महाविद्यालय और अन्य महाविद्यालय में हिंदी विभाग प्रमुख डॉ. शेख राजमोहंमद इन्होंने हिस्सा लिया ।

गत वर्ष आयोजित परीक्षाओं में विद्यार्थीयोंने कामयाबी हासिल की । इस प्रकार महाविद्यालय का हिंदी विभाग कार्यरत है ।

**- प्रा. डॉ. शेख आर. एच. (हिंदी विभाग प्रमुख)**

## इलेक्ट्रॉनिक्स शास्त्र विभाग अहवाल २०१७-२०१८

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना सन २००४ मध्ये झाली. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून विज्ञान शाखेला सुरुवात झाली. तेव्हापासून इलेक्ट्रॉनिक्स हा विभाग सुरु करण्यात आला आहे. या विभागांतर्गत प्रथम वर्षापासून ते द्रितीय वर्षापर्यंतचे वर्ग कार्यरत आहे. या विषयासाठी प्रथम वर्षाचे ६८ विद्यार्थी व द्रितीय वर्षाचे ४८ विद्यार्थिनी प्रवेश घेतला आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात भर घालण्यासाठी अद्यावत प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामध्ये उच्चप्रतिची उपकरणे व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच नवीन संशोधन कार्यात विकास होण्यासाठी प्राध्यापकांना विविध संशोधन परिषदा व कार्यशाळांना पाठविण्यात येते.

अशा प्रकारे महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स विभाग कार्यरत आहे. हे सर्व करताना संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला

**- प्रा. ढगे वाय.सी. (इलेक्ट्रॉनिक्स विभाग)**

## बी.सी.ए. विभाग अहवाल २०१७-१८

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बी.सी.ए. अभ्यासक्रमाची सुरुवात शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून करण्यात आली.

बी.सी.ए. अभ्यासक्रमांतर्गत असणाऱ्या विविध विषयांत प्राविण्य असलेल्या प्राध्यापकांना विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी बोलविले जाते.

तसेच टी.वाय. बी.सी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यासाठी प्रोजेक्ट गाईडन्स करिता तज्ञ अध्यापकांना आमंत्रित करण्यात आले.

विद्यार्थ्यांसाठी अदयावत संगणक लॅब उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये उत्कष्ट प्रतिचे संगणक व प्रिन्टर उपलब्ध आहेत. तसेच युपीरास बॅक अप व ब्रॉडबॅण्ड इंटरनेट सुविधाही उपलब्ध आहेत. बी.सी.ए. अंतर्गत येणाऱ्या सर्व विषयांसाठी उच्च दर्जाच्या प्राध्यापकांनी नेमणूक करण्यात आली आहे.

तसेच नवीन टेक्नोलॉजी अवगत होण्यासाठी प्राध्यापकांना विविध वर्कशॉप, कार्यशाळा, सेमीनार, इ. मध्ये पाठवण्यात आले आहे.

शिक्षणाव्यतिरिक्त विद्यार्थ्याच्या कलात्मक गुणांना वाव मिळवण्यासाठी विविध प्रकारचा गेम्सचे आयोजन केले जाते. टी.वाय., बी.सी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यासाठी प्लेसमेंट मार्गदर्शनाची व्यवस्था करण्यात आली.

हे सर्व करतांना संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

**- प्रा. दारूणकर पी.ए.**
**बी.सी.ए. विभाग प्रमुख**

# ग्रंथालय विभाग अहवाल

ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा ६६४१ आहे. या वर्षी १४३५४५/– किंमतीचे १०४० ग्रंथ खरेदी केलेले आहेत. ग्रंथालयात नियमित राष्ट्रीय व राज्यस्तरीय अशी ३२ नियतकालिके नियमित येत असून त्यांच्या वर्गणीसाठी खर्च केलेला आहे.

**✲ ग्रंथालयाचे विशेष उपक्रम** :–

**(१) संदर्भ सेवा** :– ग्रंथालयात विद्यार्थ्यांना विविध विषयांशी संबंधित संदर्भ पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. प्राध्यापकांना संदभृ सेवा पुरविली जाते.

**(२) नियतकालिक सेवा** :– महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालयामध्ये नियतकालिकांची सेवा उपलब्ध करून दिली जाते. त्यांच्यासाठी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मासिके उपलब्ध करून दिली जातात.

**(३) करिअर गाईडन्स्** :– स्पर्धा परीक्षा विषयक अदयायावत ग्रंथ व नियतकालिके, प्रश्नसंच उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**(४) कात्रण सेवा** :– ग्रंथालयाने महत्वाच्या विषयावरील वृत्तपत्रातील लेखांची कात्रणे संग्रहित केलेली असून संबंधित अभ्यासक्रमांना व संशोधकांना ती उपलब्ध करून दिली जातात.

**✲ ग्रंथालयाविषयी माहिती** :– ग्रंथ संपदा – ६६८४, ऑडिओ–व्हिडिओ सिडीज् – २०५, वृत्तपत्रे – ९, नियतकालिके – ३२

# शारिरिक शिक्षण क्रीडा विभाग अहवाल २०१७–१८

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये दरवर्षी विविध खेळामध्ये आंतरमहाविदयालयीन क्रीडा स्पर्धेत विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या उत्साहात सहभागी होतात. शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मध्ये विद्यार्थिनी पुढील विविध स्पर्धेत सहभागी होवून क्रीडा क्षेत्रात यश (नैपुण्य) संपादन केले. सर्व यशस्वी व सहभागी विदयार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष मा. आमदार शिवाजीराव कर्डिले साहेबांनी व संस्थेच्या सर्व पदाधिकारी तसेच प्राचार्यांनी केले.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा** :–

**(१) क्रॉसकन्ट्री** :– आंतरमहाविद्यालयीन क्रॉसकन्ट्री स्पर्धा बाबुजी आव्हाड महाविद्यालय पाथर्डी येथे पार पाडल्या. त्यात महाविद्यालयाचा विदयार्थी चंद्रकांत धकाते यांने उत्कृष्ट कामगिरी करीत यश संपादन करून सावित्रीबाई फुले विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली.

**(२) कबड्डी** :– आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा छत्रपती शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय श्रीगोंदा येथे पार पडल्या. त्यात महाविद्यालयात मुलांच्या कबड्डी संघाने सहभाग घेवून चांगली कामगिरी केली.

**(३) ॲथेलेटिक्स** :– आंतरमहाविद्यालयीन ॲथलेटिक्स क्रीडा स्पर्धा न्यू लॉ कॉलेज, अ.नगर येथे पार पडल्या. त्यात महाविद्यालयाच्या १४ विदयार्थी व ०२ विद्यार्थिनींनी सहभाग घेवून – (१) चंद्रकांत धकाते व (२) गणेश पालवे यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवून त्यांची सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

**(४) ज्युदो** :– आंतरमहाविद्यालयीन ज्युदो स्पर्धा पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर येथे पार

पडल्या त्यात महाविद्यालयाच्या संघाने सहभाग घेतला व कु. दुसुंगे हिने तृतीय व कु. पाखरे प्रतिक्षा हिने प्रथम क्रमांक मिळवित सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

**(५) मल्लखांब** :– आंतर विभागीय मल्लखांब स्पर्धा पी.व्ही.पी. कॉलेज लोणी येथे पार पडल्या. त्यात अनिकेत सुसरे योन पाचवा क्रमांक सांघिकरित्या प्राप्त केला.

**(६) कुस्ती** :– आंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा जिजामाता कला व शास्त्र महाविद्यालय भेंडा येथे पार पडला. त्यात महाविदयालयाच्या १३ विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन चांगली कामगिरी केली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेले विद्यार्थी :–

**(१) क्रॉसकंट्री** – नाशिक येथे पार पडलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धे चंद्रकांत धकाते याची निवड होवून त्याने चांगली कामगिरी केली.

**(२) मल्लखांब** – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतरविभागीय मल्लाखांब स्पर्धेत अनिकेत सुसरे याची निवड होऊन त्याने सांघिकरित्या पाचवा क्रमांक प्राप्त केला.

**(३) अॅथलेटिक्स** – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अॅथलेटिक्स स्पर्धा पुणे विद्यापीठ येथे पार पडल्या त्यात (१) चंद्रकांत धकाते, (२) गणेश पालवे यांची निवड होवून गणेश पालवे याने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

**(४) ज्युदो** – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतरविभागीय ज्युदो स्पर्धा नाशिक येथे पार पडल्या त्यात कु. पाखरे प्रतिक्षा हिची निवड झाली होती.

**✻ आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेले विद्यार्थी योगा** – युथ आंतरराष्ट्रीय योगा स्पर्धेसाठी अनिकेत सुसरे याची निवड झाली होती. राज्यस्तरीय



(महाराष्ट्र) स्तरावरील स्पर्धेत निवड झालेले विद्यार्थी.

**पॉवरलीफ्टींग** – श्रीरामपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टींग स्पर्धेसाठी सचिन गाढे याची निवड झाली होती.

✻ छत्रपती शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, श्रीगोंदा येथे पार पडलेल्या वार्षिक क्रीडा पारितोषिक प्रसंगी प्रा. मनिषा पुंडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

✻ पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्री महाविद्यालय, विळद घाट तसेच जामखेड कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, जामखेड तसेच छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्री महाविद्यालय, नेप्ती तसेच कला व विज्ञान महाविद्यालय रुईछत्तीसी तसेच राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर.

या ५ महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत निर्भय कन्या अभियानांतर्गत जावून मुली व महिलांना स्वसंरक्षणाचे मार्गदर्शन केले व प्रात्यक्षिक दिले.

तसेच श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात देखील निर्भय कन्या अभियानांतर्गत मार्गदर्शन केले व प्रशिक्षण दिले.

**– प्रा. पुंडे मनिषा,**
**शारीरिक शिक्षण क्रीडा विभाग प्रमुख**

# बहि:शाल शिक्षण मंडळ वार्षिक अहवाल २०१७-१८

बहिःशाल शिक्षण मंडळ पुणे व पुणे विद्यापीठ पुणे यांच्या अंतर्गत आमच्या विद्यालयात दि. ०३/०१/२०१७ ते ०५/०१/२०१७ दरम्यान यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. व्ही.एम. जाधव, मा.प्रा.डॉ. शिरीष लांडगे, विद्यार्थी विद्यार्थीनी व प्राध्यापक वृंद व कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. गाडे टी.डी. उपस्थित राहून उद्घाटन समारंभ झाला. व्याख्यानमालेत विविध विषयावर व्याख्याने देण्यात आले.

दि. ०३/०१/२०१७ रोजी मा.प्रा.डॉ. शिरीष लांडगे यांनी 'यशस्वी जीवनाचे सुत्र' या विषयावर व्याख्यान दिले. यशस्वी होण्यासाठी जीवनामध्ये कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे त्याचबरोबर विद्यार्थी जीवनामध्ये येणाऱ्या यश अपयशावर मात करुन सकारात्मक विचार अंगी ठेवले पाहिजे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये निश्चित बदल होतो व जीवन यशस्वी होते. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना बहुमोल असे मार्गदर्शन मिळाले.

दि. ०४/०१/२०१७ रोजी मा.प्रा. शाहिर तुळशीराम जाधव यांनी 'वैज्ञानिक दृष्टीकोन व अंधश्रध्दा निर्मुलन' या विषयावर व्याख्यान दिले. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना बऱ्याच गोष्टींचा वैज्ञानिक दृष्ट्या खुलासा करुन दिला व अंधश्रध्देचे निर्मुलन करुन विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

दि. ०५/०१/२०१७ रोजी मा.प्रा.डॉ. सुधाकर शेलार यांनी 'साविधानात्मक, सामाजिक सांस्कृतिक रचना-एक विचार' या विषयावर व्याख्यान दिले. संविधानात्मक रचना कशी आहे हे सांगून सामाजिक व सांस्कृतिक रचना विद्यार्थ्यांना सांगून बहुमोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचा सांगता समारंभ दि. ०५/०१/२०१७ रोजी श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एम. जाधव सर्व प्राध्यापक व विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित राहून यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेची सांगता झाली.

**केंद्रकार्यवाह, बहि:शाल शिक्षण विभाग**

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल २०१७-१८

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये २००४–०५ या शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) एकक कार्यरत आहे. २०१७–१८ या शैक्षणिक वर्षामध्ये १०० विद्यार्थीचे एकक कार्यरत आहे. यामध्ये ७० मुले ३० मुली सहभागी आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ या वर्षामध्ये जुलै महिन्यात नियमित कार्यक्रमास सुरुवात झाली. यामध्ये विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना या विषयी माहिती देण्यात आली. या अंतर्गत समाज सेवा व इतर कामाविषयी माहिती देण्यात आली.

**नियमित कार्यक्रमांतर्गत राबविले उपक्रम** :– राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत महाविद्यालय परिसर स्वच्छ ठेवणे, नवीन क्रीडांगणे तयार करणे. वृक्षारोपण तयार करण्यासाठी खडड्े खोदणे, विविध प्रकारच्या वनस्पती व फळाच्या बिया जमा करणे कन्यारत्न अभियान राबविणे व रस्ता सुरक्षा अभियानामध्ये भाग घेणे.

महाविद्यालयामध्ये परिसर स्वच्छता करणे, मुलगी वाचवा पोस्ट स्पर्धा आयोजन करण्यात आले वसुंधरा दिन साजरा करण्यात आला. यामध्ये Not me but you या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

**– प्रा. साठे बी.जी.**
**राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी**

---

# सांस्कृतिक विभाग

सांस्कृतिक विभागामध्ये २०१७–१८ च्या शैक्षणिक वर्षामध्ये विविध कार्यक्रमामध्ये आयोजन करण्यात आले. त्याचा आढावा खालीलप्रमाणे

स्वामी विवेकानंद यांच्या जयंती प्रित्यर्थ आमच्या महाविद्यालयामध्ये १२/०१/२०१८ रोजी युवा महोत्सव साजरा करण्यात आला. तसेच १५/०१/२०१८ रोजी सर्व महिला शिक्षकवृंद व विद्यार्थीनी यांनी मिळून हळदीकुंकू चा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.

दिनांक २७/०२/२०१८ रोजी कॉलेजमध्ये 'मराठी दिन' साजरा करण्यात आला. त्यावेळी विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धा घेण्यात आली. तसेच वत्कृत्व स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी ही या स्पर्धांमध्ये उत्स्फुर्त भाग घेतला तसेच मराठी विभाग प्रमुख डॉ. मुळे बी.एम. सरांनी मराठीची थोरवी सांगितली व आपली मायबोली मराठी कशी श्रेष्ठ व अलंकारयुक्त आहे याबद्दल विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. २८/०२/२०१८ रोजी सायन्स डिपार्टमेंट मध्ये विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यावेळी सायन्य विभागप्रमुख प्रा. मोहिते सी.पी. व प्रा. वाघ एस. यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान व मानवीजीवन यांचा एकमेकांशी असणारा घनिष्ट संबंध विदयार्थ्यांसमोर प्रस्तापित केला व विज्ञानाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच विदयार्थ्यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

तसेच महात्मा गांधी जयंती, सावित्रीबाई फुले जयंती, शिवजयंती अशा थोर व्यक्तींच्या जयंत्याही साजऱ्या करण्यात आल्या. शिवजयंती निमित्त विद्यार्थ्यांनी पोवाडे गायले व शिवरायांचे कार्यनीती, राजनीती व कर्मनीती याबद्दल अनेक भाषणे झाली.

अशा प्रकारे वर्षभर सांस्कृतिक विभागामध्ये कार्यक्रम चांगल्याप्रकारे पार पाडले.

प्रा. काळे व्ही.ए. (एम.एस्सी. सेट)

# कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना अहवाल २०१७-१८

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यात शिक्षण घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे पण ज्यांना शिकरण्याची आकांक्षा आहे असे विद्यार्थी 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका ' योजनेचा लाभ घेऊ शकतात. ही योजना महाविद्यालय २००५ सालापासून कार्यरत असून आज मितीस ४४ विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत असून आपले शिक्षण घेत आहेत आणि हाच उद्देश कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचा आहे.

या योजनेतून विद्यार्थ्यांना फक्त आर्थिक मदती बरोबरच अनेक कामे करण्याची संधी मिळते. ग्रंथालय विभाग, संगणक विभाग, अनेक प्रयोगशाळा, कार्यालय व बागकाम अशा विविध विभागांमध्ये काम करण्याची संधी मिळाल्यामुळे त्यांना अभ्यासाबरोबर इतर विभागांचेही ज्ञान मिळते. तसेच विद्यार्थ्यांना श्रम संस्काराचे महत्व कळाले.

**- प्रा.डॉ.सौ. कीर्तने व्ही.एस्.**
**कमवा व शिका योजना**

# विद्यार्थी विकास मंडळ अहवाल २०१७-१८

पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ आणि श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बुऱ्हाणनगर यांच्या सहयोगाने महाविद्यालयामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना विशेष मार्गदर्शन योजना, विद्यार्थी व्यक्तीमत्व विकास योजना, निर्भय कन्या अभियान योजना तसेच आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन या शैक्षणिक वर्षात करण्यात आले.

विशेष मार्गदर्शन योजने अंतर्गत महाविद्यालयातील सर्व शाखाच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांच्या तज्ञांची व्याख्याने आयोजित केली गेली

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळण्यासठी विद्यार्थी व्यक्तीमत्व कार्यशाळेचे आयोजन केले गेले यामध्ये विविध महाविद्यालयातील व्याख्यात्याच्या व्याख्यानाचे आयोजन केले गेले. तसेच निर्भय कन्या अभियान व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देखील विद्यार्थ्यांना देण्यात आले.

या विभागांतर्गत महाविद्यालयामध्ये रॅगींग समिती अस्तित्वात आहे व तिचे काटेकोर पालन केले जाते.

या योजनेचे विशेष म्हणजे गरीब व होतकरू मुलामुलींसाठी कमवा व शिका योजना राबविली जाते. या वर्षी ४४ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला व आपल्या कमवलेल्या पैशांनी शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला.

या प्रकारे महाविद्यालयामध्ये विदयार्थी विकास मंडळ कार्यरत आहे.

**प्रा.डॉ. शेख आर. एच.**
**विद्यार्थी कल्याण अधिकारी**